109

फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग

# ''कृषी व संलग्न सेवा'' योजनेअंतर्गत योजनांचे मुल्यमापन

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, पुणे - ४११ ००१.

१९९४

प्रस्तावना

भारत हा मूलतः शेतीप्रधान देश आहे. जवळजवळ 70 टक्के लोकसंख्या शेती किंवा शेतीशी निगडीत व्यवसायांवर चरितार्थासाठी अवलंबून आहे. विशेषतः आदिवासी जमात पूर्णपणे शेतीवर किंवा शेतमजूरीवर अवलंबून असल्याचे दिसून येते. आदिवासींच्या सामाजिक व धार्मिक रुढीवरुन, चालीरितीवरुन त्यांचे जमीन, शेती, पिके, जंगले, झाडे यांचेशी एकप्रकारचे भावनात्मक नाते असल्याचे दिसून येते.

अगदी सुरवातीच्या काळात अन्न जमविणे व शिकार करणे हीच मुख्यत्वे करुन आदिवासींची चरितार्थाची मुख्य साधने होती. पण जसजसा काळ पुढे जाऊ लागला व भौगोलिक सुधारणा, शिक्षण , पुढारलेल्या समाजाशी थोडाफार आलेला संपर्क, शिक्षणाचा प्रसार वगैरे कारणामुळे आदिवासी शेती करु लागला. जंगलातील झाडे तोडून जमीन सपाट करुन लागवडीयोग्य करण्याचा प्रयत्न करु लागला. परंतू यापेक्षा जास्त प्रगती त्याने न केल्याने आधुनिक शेतीतंत्राचा वापर अगदी नगण्य असल्याचे दिसून येते. तसेच शेतीची आधुनिक अवजारे व तंत्रज्ञान आत्मसात करणे आदिवासींच्या शिक्षणाच्या अभावामुळे केवळ अशक्य होते. त्यामुळे शेतीपासून मिळणारे उत्पन्न अगदीच तुटपुंजे असल्याचे दिसून येते. त्यात भरीस भर म्हणून की काय आदिवासींची जवळ जवळ सर्व शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने वर्षातून एकदाच पीक घेणे शक्य होते. त्यातच पावसाने दडी मारली किंवा जास्त पाऊस झाला तर पिकांचे जास्तीत जास्त नुकसान होत असते व आधीच गरीब असलेला आदिवासी दारिद्रयाच्या खाईत लोटला जातो.

या सर्व दुष्टचक्रातून आदिवासींना सोडवयाचे असेल तर अनेक गोष्टी करणे आवश्यक आहे. याचा उहापोह प्रस्तुत मूल्यमापन अहवालात केला आहे. आदिवासी विकास विभागाची महाराष्ट्र राज्यात स्थापना झाल्यापासून विशेषत्वाने आदिवासींच्या शेतीसुधारणा व तत्सम व्यवसायांना चालना देण्याचा प्रयत्न मोठया प्रमाणात झाल्याचे दिसून येते. निरनिराळया विभागाच्या या अनुषंगाने असलेल्या योजना आदिवासींसाठी आणखी सोप्या व कमी खर्चाच्या प्रसंगी 100 टक्के अनुदानीत तत्वावर करण्यात आल्यात व त्याचा लाभ आदिवासींना मोठया प्रमाणात मिळविण्यासाठी यंत्रणा उभारण्यात आली. प्रस्तुत अहवालात या यंत्रणेच्या कामाचे मूल्यमापनही करण्यात आलेले आहे. शासनाच्या एखाद्या चांगल्या योजनेच्या अंमलबजावणी यंत्रणेच्या अकार्यक्षमतेमुळे कसा बोजाबार उडतो हेही या पाहणीतून दिसून आले. उदाहरणच द्यायचे झाल्यास 100 टक्के अनुदानाने काही शेतक-यांना विद्युत पंप पुरविण्यात आले. पण 2/3 वर्षे होऊन्न देखील वीजेचे कनेक्शन न मिळाल्याने ते धूळ खात शेतक-यांच्या घरी नुसतेच पडून असल्याचे दिसून आले. शेतक-यांचे उत्पन्न वाढते म्हणून जोडधंद्यासाठी त्यांना एक दिवसाच्या कोंबडयांच्या पिल्लांचे वाटप करण्यात आले. पण त्यांचे संगोपन व काळजी कशी घ्यावयाची ही माहिती नसल्याने व प्रशिक्षणाची व्यवस्था नसल्याने जवळ जवळ सर्व लाभार्थींची पिल्ले दगावल्याचे व शून्य लाभ मिळाल्याचे विपरित चित्र दिसून आले. त्यामुळे योजनांची अंमलबजावणी व त्यासाठी लागणारे कार्यक्षम अधिका-यांची उपलब्धता व इतर विभागांशी

करावयाचे सहकार्य या गोष्टींना महत्व प्राप्त होते. त्यासाठी प्रभारी यंत्रणा निर्माण करणे अगत्याचे आहे. 1993 च्या शासन निर्णयाप्रमाणे अशाप्रकारची एकसूत्री प्रशासना द्वारे अशी यंत्रणा निर्माण झाल्याचे दिसून येते. त्याचे कार्य, कर्तृत्व व मूल्यमापन पुढील काळच ठरवील. पण आजतरी कार्यक्षम यंत्रणेचा भास निश्चितच होत असल्याचे दिसून येते.

आदिवासी हा अल्पभूधारक असलेला दिसून येतो. तसेच सिंचनाखाली असलेले आदिवासी क्षेत्र केवळ नगण्य आहे. त्यामुळे बागायती क्षेत्रात वाढ, कोरडवाहू जमीनीत योग्य ती पिके घेण्यासाठी प्रशिक्षणे व मदत, शेतीशी निगडीत असलेल्या जोडधंद्यांची सुरवात व वाढ व इतर उपजीविकेच्या साधनांची उपलब्धता आदिवासींना मोठया प्रमाणावर अनुदानित तत्वावर करून देणे हा एकमेव मार्ग त्यांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीच्या दिशेने नेऊ शकतो. त्याचबरोबर शिक्षणाचा प्रसार होणे महत्वाचे आहे.

सदर मूल्यमापन अहवाल तयार करण्याचे काम या संस्थेतील सौ. मंगल दि. घोडे, संशोधन अधिकारी यांनी केले. श्री. आर. आर. साबळे, वरिष्ठ अन्वेषक व श्री. आय. आर. तडवी यांनी त्यांना या कामी सहाय्य केले.

तसेच या योजनांची माहिती पुरविण्यासाठी पुणे जिल्हयातील कृषी विभाग, फलोत्पादन विभाग, पशुसंवर्धन विभाग, दुग्धविकास, आदिवासी विकास विभाग, सहकार, मत्स्यव्यवसाय विभाग इ. विभागांचे कार्यान्वियन अधिकारी, पुणे जिल्हा नियोजन अधिकारी, संबंधित गांवचे ग्रामसेवक इ. चे चांगले सहकार्य मिळाले.

सदर मूल्यमापन पाहणी अहवाल कृषी व संलग्न सेवा योजनांची आखणी व अंमलबजावणी करणारे अधिकारी, आदिवासी विकास विभागातील कर्मचारी, आयुक्त, आदिवासी विकास व इतर संबंधितांना उपयोगी पडेल, अशी आशा आहे.

पुणे

दि. 18.4.94

(डॉ. नवीनचंद्र जैन)
संचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे 1

# अ नु क्र म णि का

| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| 1. | प्रास्ताविक | 1 |
| 2. | मूल्यमापन अभ्यासाची उदिष्टये, गांवे/लाभार्थी कुटुंबे नमुना निवड पध्दती | 12 |
| 3. | उदाहरणादाखल काही वैयक्तिक लाभार्थी प्रकरणांचा अभ्यास | 20 |
| 4. | सर्व्हेक्षणात गोळा केलेल्या सांख्यिकी माहितीचे पृथःकरण | 32 |
| 5. | निरीक्षणात्मक बाबी | 40 |
| 6. | निष्कर्ष, सूचना तथा शिफारशी | 45 |
| 7. | प्रपत्र क्रमांक-1 लाभार्थीसाठी भरावयाचे पत्रक | 48 |
| 8. | प्रपत्र क्रमांक-2 अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी प्रश्नावली | 49 |

## प्रकरण क्र.1

### प्रास्ताविक

जगात भारत हा देश शेतीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. देशातील विविध राज्यांच्या अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचा विचार केल्यास देशातील अनुसूचित जमातीच्या एकूण लोकसंख्येच्या 7.3 टक्के लोकसंख्या महाराष्ट्रात असून राज्यांच्या क्रमवारीत महाराष्ट्राचा सहावा क्रमांक आहे.

महाराष्ट्रात 1981 च्या जनगणनेनुसार 6,27,84,171 लोकसंख्येत 57.72 लक्ष अनुसूचित जमातीची लोकसंख्या असून एकूण लोकसंख्येशी हे प्रमाण 9 टक्के येते.

राज्यातील 68.73 लक्ष शेतक-यांपैकी 4.13 लक्ष अनुसूचित जमातीचे शेतकरी आहेत. याचाच अर्थ 41 टक्के कुटुंब शेतकरी असून साधारण तेवढ्याच प्रमाणात इतर कुटुंबे शेतमजूरीवर आपली उपजीविका करतात.

आदिवासी भागात शेती व शेतमजूरी यावरच प्रामुख्याने उपजीविका अवलंबून असली तरी ही शेती पारंपारिक पध्दतीने करण्यात येत असल्याने शेतीपासून मिळणारे उत्पन्न अत्यंत तुटपुंजे आहे.

आदिवासीचा शेतीकडे पाहण्याचा मूळ दृष्टीकोन "जीवन जगण्याचा मार्ग" हा असल्याने त्याला व्यावसायिक स्वरुप नाही. त्यामुळे शेती करण्याच्या आधुनिक तंत्राचा अवलंब सुधारीत बि-बियाणे, रासायनिक खते इ.चा उपयोग अभावाने आढळतो. बिगर आदिवासी क्षेत्रात सुधारीत तंत्राचा वापर ज्या वेगाने अंगीकारला गेला त्या वेगाने त्याचा प्रसार आदिवासी भागात आजही आढळून येत नाही.

तरीसुध्दा हे चित्र हळूहळू बदलत आहे. शासनाद्वारे विविध योजनांच्या माध्यमातून आधुनिक तंत्र आदिवासी भागातील शेतक-यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात असल्याने आदिवासी भागात आधुनिक तंत्राचा अत्यंत धिम्या गतीने का होईना अंगीकारला जाऊ लागला आहे. शेती विकासाचा वेग कमी असण्याची अतिदुर्गमता, दळणवळणाच्या साधनांचा अभाव, विकसित भागाशी संपर्काचा अभाव, दारिद्रय, शैक्षणिक मागासलेपण आणि प्रामुख्याने पारंपारिक पध्दतीवरुन आधुनिक तंत्राच्या वापराकडे वळण्याकरिता आवश्यक ती मानसिक तयारी करणा-या यंत्रणेचा अभाव व त्याकरिता आवश्यक दृष्टीकोनाची कमतरता ही प्रमुख कारणे दिसून येतात.

1.2 राज्याच्या आदिवासी उपयोजना क्षेत्राचा विचार केला तर असे दिसून येते की, हे क्षेत्र एकत्रित सलग नसून ते तीन विभागांत पसरलेले आहे.

1. पश्चिमेकडील सहयाद्रीचा पट्टा
2. उत्तरेकडील सातपुडयाचा पट्टा
3. पूर्वेकडील गोंडवनाचा पट्टा

राज्यातील बहुतेक आदिवासी समाज सहयाद्रीच्या पट्टयात राहत असून त्यामध्ये ठाणे, रायगड, पुणे, अहमदनगर, नाशिक हे जिल्हे मोडतात. सातपुडयाच्या पट्टयात धुळे, जळगांव, अमरावती, जिल्हयांचा काही भाग येतो. तर गोंडवन भागात यवतमाळ, नांदेड, नागपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्हयांचा समावेश होतो. थोडक्यात राज्याचे आदिवासी उपयोजना क्षेत्र वरील 14 जिल्हयांमध्ये विखुरलेले आहे.

1.3 राज्याच्या आदिवासी उपयोजना क्षेत्राची काही ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे सांगता येतील.

1) डोंगराळ भाग 2) जमिनीची प्रत. याबाबत या विभागातील जमिनीदेखील ठिकठिकाणी वेगवेगळया आढळून येतात. तसेच जमिनीची प्रत आणि पावसाच्या प्रमाणात मोठी तफावतही दिसून येते. त्यामुळे आदिवासी विभागात पिकांची योजना ठिकठिकाणी वेगळी दिसून येते. आदिवासी मोठया संख्येने डोंगराळ व दुर्गम भागात राहत असून त्यांची शेती करण्याची पध्दती लगतच्या बिगर आदिवासी क्षेत्रापेक्षा जास्त मागासलेली आहे. म्हणूनच आदिवासींच्या शेती करण्याच्या पध्दतीमध्ये सुधारणा घडवून त्यांना बिगर आदिवासी क्षेत्रातील लोकांच्या बरोबरीने आणण्याचे काम फारच महत्वाचे व खडतर स्वरुपाचे आहे. आदिवासींच्या जीवनाकडे पाहण्याच्या एकंदर असलेल्या वृत्तीची प्रचिती आपल्याला त्याच्या नवनवीन तंत्राची उचल करण्याच्या अत्यंत धीम्या गतीवरुन येते. याउलट लगतच्या बिगर आदिवासी भागातील शेतकरी तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करुन सुधारलेल्या शेतीपध्दतीचा अवलंब करीत आहेत. लगतच्या भागातील शेतक-यांनी जागरुकतेमुळे सुधारलेल्या शेती पध्दतीच्या अवलंबनाकरिता अनुदान रुपाने मिळणा-या निरनिराळया सवलतींचा फायदा कित्येक वर्षापासून मोठया प्रमाणावर घेतलेला आहे. याच सवलतींचा फायदा विचित्र आर्थिक व सामाजिक शैक्षणिक मागासलेपणाच्या परिस्थितीमुळे आदिवासी शेतकरी त्या प्रमाणात घेऊ शकलेले नाहीत. राज्यातील आदिवासी भागातील वैशिष्टयपूर्ण भौगोलिक परिस्थितीमुळे तेथील शेतीही तितकीशी फायदेशीर राहिलेली नाही. अशा परिस्थितीत आदिवासी क्षेत्रातील शेती सुधारावयाची असेल तर विविध आव्हानांना सामोरे जाऊन विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.

राज्यातील आदिवासी भागामध्ये एका बाजूला भरपूर पाऊस पडणार भाग तर दुस-या बाजूला पावसाचे अल्प प्रमाण असे विरोधी चित्र दिसते. सिंचनाच्या नगण्य सोई असल्याने बारमाही उत्पन्न हा शेतकरी घेऊ शकत नाही. त्यामुळे संपूर्ण शेती सर्वस्वी पावसावरच अवलंबून असल्याचे दिसते. शेती उत्पादन वाढीसाठी जमिनीची सुपीकता वाढवून पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढविण्यासाठी उपाययोजना करणे अगत्याचे आहे. कोरडवाहू शेती तंत्रामध्ये, पीकपध्दतीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी विशेष लक्ष देण्याची नितांत गरज आहे.

7 व्या पंचवार्षिक योजनेमध्ये अन्नधान्य व त्यांचे उत्पादन वाढीचे उदिष्टये डोळयासमोर ठेवण्यात आले होते. त्या अनुषंगाने आदिवासी भागातील शेती व शेतकरी यांचेकडे विशेष लक्ष केंद्रित करण्याच्या आवश्यकतेवर भर देण्यात आला. आदिवासी शेतक-यांना सुधारीत बि-बियाणे, रासायनिक खतांचा वापर, पीक संरक्षण व संवर्धन योजनांची माहिती करून देणे गरजेचे आहे. नवीन पध्दती वापर करण्यासाठी तसेच आदिवासी शेतक-यांना प्रशिक्षणाद्वारे उपजाऊ शेती करण्यावर भर देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने विविध योजनांची आखणी करून अंमलबजावणी केली आहे.

शेती हा राज्यातील आदिवासींचा मुख्य व्यवसाय असून सुमारे 80 टक्के आदिवासी शेतीवर उपजीविका करीत आहेत. तेव्हा "कृषी व संलग्न सेवा" या विभागांतर्गत शासनाने राबविलेल्या योजनांचा अभ्यास करून त्यासंबंधीचा मूल्यमापन अहवाल तयार करण्याचे ठरविण्यात आले.

1.4 "कृषी व संलग्न सेवा" या विभागांतर्गत राबविण्यात आलेल्या विभागवार योजनांचे स्वरुप व इतर अनुषंगिक माहिती :-

---

**1. पीकसंवर्धन :-**

1. (विशेष घटक योजना धर्तीवर) दारिद्रय रेषेच्या वर आणण्यासाठी आदिवासींना विशेष सहाय्य देण्याची योजना (उसाच्या लागवडीचा समावेश करून)

वरील योजनेंतर्गत आदिवासी शेतक-यांना खालील योजनांचा लाभ देण्यात येतो.

अ. आदिवासी शेतक-यांना निविष्ठा वाटप :-

आदिवासी शेतक-यांना त्यांची आर्थिक परिस्थिती व गरज लक्षात घेऊन

सुधारीत जातीचे बि-बियाणे, खते- युरिया, सुफला, किटकनाशके, औषधे यांचा पुरवठा केला जातो. (निविष्ठा वाटप मोफत असल्यामुळे) त्यांचा लाभ सर्व शेतक-यांना घेता येतो. सर्व निविष्ठांचे वाटप आदिवासी शेतक-यांना मोफत करण्यात येते. सदर निविष्ठा संचामध्ये सुधारीत बि-बियाणे, 10 किलो युरिया, सुफला प्रत्येकी 1 गोणी, याप्रमाणे वाटप करण्याची तरतूद आहे.

ब. बैलगाडी/बैलजोडी वाटप :-

आदिवासी शेतक-यांना शेतीमशागतीसाठी व बिगर शेती कालावधीत वाहतूकीचा धंदा शक्य व्हावा अशा दृष्टीने बैलजोडी अथवा बैलगाडी विकत घेण्याकरिता एकूण किंमतीच्या 50 टक्के रक्कम गरजू शेतक-यांना बँकेमार्फत कर्ज म्हणून पुरविण्यात येते. कोणत्याही परिस्थितीत ही रक्कम शेतक-याला परस्पर रोख दिली जात नाही. दोन्हीपैकी एक खरेदी करण्याची मुभा त्याला देण्यात येते. कर्जावर घेतलेली बैलगाडी अथवा बैलजोडी बँकेस तारण म्हणून ठेवण्यात येते.

क. जमीन सपाटीकरण :-

आदिवासी भाग मूळचा डोंगराळ व द-याखो-यांचा परिणामतः जमीन उंच सखल असल्याने शेतक-यांच्या जमिनी सपाट करुन देण्याची योजना शासनाने हाती घेतली आहे. या योजनेखाली प्रत्येक शेतक-याच्या शेतामध्ये जास्तीत जास्त 20 तास बुलडोझरने जमिन सपाट करुन दिली जाते. किंवा शेतीचे क्षेत्र निश्चित ठरवून रु.6,330/- पर्यंत जमीन सपाटीकरणासाठी 50 टक्के खर्च करण्याची तरतूद शासनाने केली आहे.

2. कडधान्य उत्पादन कार्यक्रम :-

आदिवासी विभागामध्ये कडधान्य पिकांसाठी सलग क्षेत्र जवळजवळ घेतले जात नाही. त्यामुळे कडधान्याचे क्षेत्र फारसे वाढलेले दिसत नाही. पंचायत समिती, कृषी विभागामार्फत कडधान्य बियाणासाठी 50 टक्के अनुदान शेतक-यांना मिळते.

3. तेलबिया उत्पादन कार्यक्रम :"

आदिवासी भागात विशेषतः सुधारीत संकरीत (माझा पॉकेटमध्ये ) गळीत धान्याची पिके फार मोठ्या प्रमाणात घेतली जात नाही. तेव्हा भुईमुग पिकाचे क्षेत्र वाढविण्यासाठी या योजनेतून भुईमुग पिकांची प्रात्यक्षिके 10 एकर क्षेत्रांवर

घेण्यासाठी 50 टक्के सवलतीच्या दराने 50 रुपयापर्यंत बियाणे, खत व औषधे दिली जातात.

2. **फलोत्पादन :-**

फलोत्पादन विकासाच्या विविध योजनांची आराखी व अंमलबजावणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यामध्ये शेती व सहकार खात्यामार्फत करण्यात येते. फलोत्पादन विकासाच्या विविध योजनांची अंमलबजावणी नीट व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र फलोत्पादन संचालन स्थापन करण्यात आले आहे. या संचालनालयाच्या अधिपत्याखाली प्रत्येक विभागासाठी अधीक्षक फलोत्पादन अधिकारी व जिल्हा पातळीवर उपसंचालकांचे कार्यालय आहे. उपसंचालकांचे मदतीसाठी सहकार व सांख्यिकी विभागातील तज्ञ अधिकारी नेमण्यात आले आहेत. तालुका पातळीवर रोपवाटिकेसाठी एक फलोद्यान अधिकारी व किमान एक माळी असा कर्मचारीवृंद नेमण्यात आला आहे. अशाप्रकारे फळबागा विकासाच्या व फुलझाड लागवडीच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. शेतक-यांशी संपर्क साधून फलोद्यान विकास योजना राबविण्यासाठी फळबाग लागवडीचे महत्व पटवून देणे, झाडाना कलमे करणे/डोळा भरणे, शेतक-यांना बँकामार्फत कर्जपुरवठा करणे, भांडवली अनुदान योजना राबविणे, रोपमळ्यातून रोपांच्या कलमांचा पुरवठा करणे इ.कामे तसेच सहकार्य या खात्याकडून देण्यात येते. फळझाडे लागवडीचे आदिवासी भागात विशेष महत्व आहे. आदिवासींची डोंगर उतारावरील जमीन, जमिनींचे लहान लहान तुकडे, शेतीसाठी पाण्याचा अभाव, आदिवासी शेतक-यांची हलाखीची आर्थिक स्थिती, शैक्षणिक मागासलेपणा त्यादृष्टीने आर्थिक, औद्योगिक व नैसर्गिक फायदा अधिक आहे.

1. **भाजीपाला विकासाकरिता उत्तेजन :-**

आदिवासी शेतक-यांना त्यांच्या दैनंदिन आहारात भाजीपाल्याचा वापर सुलभ व्हावा व गरज भागवून उरलेले भाजीचे उत्पादन जवळच्या बाजारपेठेमध्ये विकून आर्थिक लाभ मिळविता यावा हा या योजनेमागील उद्देश आहे.

सदर योजनेंअंतर्गत लहान सीमांतिक व आदिवासी शेतक-यांना त्यांच्या 0.10 हेक्टर क्षेत्रावर भाजीपाल्याची लागवड करण्यासाठी, सुधारित बि-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशक, त्यांच्या निविष्ठा (मिनीकिट्स) विनामूल्य पुरविल्या जातात. सदर निविष्ठांची किंमत रु.100/- असून भाजीपाला लागवडीकरिता उत्तेजन मिळावे यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे.

2· निरनिराळ्या फळपीकांचे पुनरुज्जीवन :-

जुन्या फळबागापासून मिळणा-या उत्पादनात घट होत असल्याने अशा जुन्या फळबागांचे उत्पादन वाढविण्यासाठी सुधारीत मशागत पध्दतीचा अवलंब करुन उत्पादन वाढविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे·

उत्पादन घटलेल्या शेतक-यांच्या बागांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी निवड करावयाची असून पुनुरुज्जीवनाचा खर्च सदर शेतक-याने स्वतः करावयाचा आहे· लहान व जनजाती शेतक-यांना बागांच्या पुनरुज्जीवनासाठी होणा-या खर्चाचा भार कमी व्हावा म्हणून खर्चाच्या 50 टक्के किंवा दर हेक्टरी कमाल रु·1,000/- पर्यंत अर्थ सहाय्य देण्यात येते· इतर शेतक-यांना खर्चाचा 25 टक्के परंतू हेक्टरी जास्तीत जास्त रु·500/- पर्यंत अर्थसहाय्य देण्यात येते· या योजनेचे वैशिष्ठ्य अस की सतत 3 वर्षे त्याच प्लॉटावर ही योजना राबवून उत्पादनात वाढ झाली किंवा कसे याची नोंद घेऊन ठरविण्यात येते·

3·गांवठी बोर व आंब्याच्या झाडांचे पुनरुज्जीवन व ग्रामपंचायतींना आंब्याच्या झाडांचे नूतनीकरणासाठी प्रोत्साहन सहाय्य :-

या योजनेखालील आदिवासी शेतक-यांकडील स्वतःच्या मालकीच्या गावठी आंबा किंवा बोराच्या झाडावर बगल कलम अथवा डोळा भरुन त्यांचे सुधारीत जातीत रुपांतर करता येते· याशिवाय ज्या अल्पभूधारकांनी स्वतःच्या खर्चाने आपल्या मालकीची आंबा व बोर झाडांचे कलम करुन घेतले असेल त्यांना प्रत्येक यशस्वी झाडामागे आंब्यास रु·5/- तर बोर झाडास रु·3/- प्रमाणे अनुदान देण्याची व्यवस्था केली आहे· मात्र यासाठी फलोद्यान विभागास पूर्वसूचना देणे जरुरीचे आहे·

तसेच स्थानिक संस्था म्हणजे ग्रामपंचायत आपल्या हद्दीत किमान 500 झाडे (आंबा, बोर मिळून) सुधारीत जातीमध्ये रुपांतर करुन जगवून दाखवतील· अशा संस्थांपैकी पहिल्या 2 क्रमांकाच्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहनासाठी अनुक्रमे रु·3000/- व रु·2000/- ची रोख बक्षिसे शासनाने ठेवलेली आहेत·

4· अल्पभूधारक व सीमांतीक शेतक-यांना फलोद्यान विकासासाठी भांडवली अनुदान

अल्प व सीमांतीक आदिवासी शेतक-यांकडे पुरेसे भांडवल तरतूद नसल्याने ते फलोत्पादन योजनेपासून वंचित राहतात· अल्पभूधारकांना शेती विकासाव्यतीरिक्त उत्पन्नाचे जोड साधन मिळावे, म्हणून अल्पभूधारक व छोट्या शेतक-यांना फळबाग

लागवडीला उत्तेजन देण्यासाठी भांडवली अनुदानाची योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण कृषी विकास बँकेने (नाबार्ड) अल्पभूधारक शेतक-यांची व्याख्या ठरविताना जमीन धारणेची मर्यादा शिथिल केली आहे. अल्प व सीमांतीक कास्तकारांची जमीन 17.25 एकर (6.90) पेक्षा जास्त नसावी. सदर योजनेमध्ये फळझाडे लावण्यासाठी शेतक-यांना भू-विकास बँक व राष्ट्रीयकृत बँकांकडून दीर्घमुदतीचे कर्ज देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सुमारे 15 वर्षे मुदतीचे ह्या कर्जाची परतफेड फळधारणेनंतर 5 ते 7 वर्षात करावी लागते. तसेच अल्पभूधारकांवरील कर्जाचा बोजा हलका व्हावा म्हणून 33 1/3 टक्के अनुदान दिले जाते. हापूस आंब्याच्या लागवडीस 50 टक्के इतके अनुदान देण्यात येते. बँकांनी दरवर्षी किती व कशाप्रकारे टप्प्याटप्प्याने अर्थसहाय्य करावे याचा तपशील निर्धारीत करण्यात आला आहे.

**5. फलोद्यान विकासाच्या घरकुल योजनेसाठी भांडवली अनुदान :-**

या योजनेखाली फलोद्यान विकास कार्यक्रमासाठी शासनाने ग्रामीण भागात बांधून दिलेल्या घरकुलातील आदिवासी कुटुंबांना त्यांच्या घराभोवती लावण्यासाठी 100 टक्के अनुदानावर प्रत्येकी 5 फळझाडांची रोपे/कलमे रोपमळ्यातून दिली जातात.

**6. पुष्प संवर्धन विकास कार्यक्रम :-**

भारतीय संस्कृतीमध्ये धार्मिक सण, समारंभ व सजावट इ.प्रसंगी फुलांना अनन्य साधारण महत्व आहे. फुलझाडाखालील क्षेत्र वाढवून फुलांचे उत्पादन मोठया प्रमाणावर घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने लहान व सीमांतीक शेतक-यांना फुलांचे बी व पीक संरक्षक औषधे निविष्ठा (मिनिकीटस्) वाटण्यात येतात. सदर निविष्ठांची किंमत रु.75/- असते. परंतू आदिवासी शेतक-यांना निविष्ठा 50 टक्के अनुदानावर तर सर्वसाधारण शेतक-यांना 33.1/3 टक्के अनुदानावर उपलब्ध करून देण्यात येतात.

**3. पशुसंवर्धन :-**

पशुधन विकास आणि पशुधनाचे रोगराईपासून संरक्षण ही पशुसंवर्धन खात्याची प्रमुख कार्ये होत. पशुधनापासून दूध, अंडी, मांस हे अन्नपदार्थ मिळतात. तसेच व्यापारीदृष्ट्या महत्वाची अशी लोकर, कातडी व हाडे इत्यादी उत्पादनेही मिळतात. वरील प्राणिज पदार्थाचे उत्पादन वाढविण्यासाठी आणि पशुधनाची हानी कमी करून त्यांची उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टीने खालील पशुसंवर्धनाचे कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत.

**1. शेतक-यांना प्रशिक्षण देणे :-**

आदिवासी लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यावर विशेष भर देण्यात आलेला आहे. दुधाची शास्त्रोक्त पध्दतीने हाताळणी, दुभत्या जनावरांचे संगोपन, जनावरांचे रोग व त्यावरील उपचार इ.चे प्रशिक्षण देण्यात येते.

परंतू अशाप्रकारचे प्रशिक्षण "दुग्धव्यवसाय" विभागामार्फत देण्यात येते.

हे प्रशिक्षण 1 ते 2 आठवडे या कालावधीचे असते. पुणे जिल्हयातील प्रशिक्षणार्थींना पुण्यापासून 8 कि.मी.अंतरावर "ताथवड फार्म" येथे हे प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी प्रवासखर्च, राहणे, जेवण इ.खर्च हा या योजनेमार्फत करण्यात येतो.

**2. पशुवैद्यकिय :-**

पशुवैद्यकिय महाविद्यालयातील आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन या योजनेतून आदिवासी सुशिक्षित तरुणांना पशुवैद्यक शास्त्रातील पदवी संपादन करता यावी, म्हणून द.म. रु.150/- विद्यावेतन व इतर खर्चासाठी वर्षाला 1200 रु. सानुग्रह अनुदान देण्याची सोय आहे. यासाठी 12 वी (शास्त्र) परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

ही योजना विभागीय उपसंचालक, पशुसंवर्धन विभाग, पुणे, मुंबई, नासिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर यांचेमार्फत राबविण्यात येते. इच्छुकांनी यासाठी प्रथम संबंधित जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांचेशी संपर्क साधावा लागतो.

**3. संकरित कालवडी जोपासण्यासाठी सहाय्य :-**

**4. विद्यमान पशुवैद्यकिय संस्थांना औषधे पुरविणे :-**

**5. पशुवैद्यकिय दवाखाना व पशु प्रथमोपचार केंद्र बांधणे :-**

या कार्यक्रमाखाली (आदिवासी भागातील) सध्या अस्तित्वात असलेल्या पशु वैद्यकीय प्रथमोपचार केंद्राचा दर्जा वाढवून त्यांचे पशुवैद्यकिय दवाखान्यात रुपांतर केले जाते. तसेच या भागात नवीन पशुवैद्यकिय दवाखाने व प्रथमोपचार केंद्रे

स्थापन केली जातात. पशुवैद्यकिय प्रथमोपचार केंद्राच्या किंवा दवाखान्यांच्या इमारतीचे बांधकामही करण्यात येते. तसेच सध्या आस्तित्वात असलेल्या दुर्गम भागातील पशुवैद्यकिय संस्थांना औषधे पुरविली जातात. फिरते पशुवैद्यकीय दवाखाने चालू करण्यात येऊन दूरदूरच्या दुर्गम भागात पशु वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येते. गाई-गुरांचे लाळ, खुरकुत रोगांपासून संरक्षण करण्यासाठी या रोगाच्या लशीचे वाटपही मोफत केले जाते.

**6. फिरत्या पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयाची स्थापना :-**

**7. पशु प्रथमोपचार केंद्र/आधारभूत ग्राम केंद्र/कृत्रीम रेतन केंद्राचा दर्जा वाढविणे**

**8. तोंडाचे व पायाचे रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी अर्थसहाय्य**

**9. पशुखाद्य वैरण कामासाठी पायाभूत बाबींचे बळकटीकरण करणे**

**10. वळूंचे वाटप :-**

दुर्गम भागातील जनावरांचा दर्जा सुधारण्यासाठी जातीवंत गोवंशावळीचे वळू व म्हैस वळू (रेडे) त्या भागातील आदिवासींना मोफत वाटले जातात. जे आदिवासी शेतकरी वळू संभाळण्यास तयारी दर्शवितात त्यांना त्यासाठी द.म.रु.60/- या दराने वळू खावटी दिली जाते. वळूंची किंमत रु.2000/- रुपयांपर्यंत अनुदान म्हणून समजण्यात येते. दरवर्षी जवळजवळ 100 ते 150 वळूंचे वाटप करण्याचे उद्दिष्टय आहे. ही योजना जिल्हा पशु संवर्धन अधिकारी यांचेमार्फत राबविण्यात येते.

4. **दुग्धव्यवसाय विकास :-**

आदिवासी विभागातील दुग्ध व्यवसायात वाढ व्हावी यादृष्टीने राज्य शासनाच्या अनेक योजना आहेत. अधिक दूध देणा-या गाई-म्हशी आदिवासींना मिळाव्यात ह्यादृष्टीने 196 कृत्रीम गर्भदान केंद्रे आहेत. ग्रामीण भागात रोजगारासाठी संधी व उत्पन्न यात निश्चित वाढ करणारा एक सफल जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय विकासाला अत्यंत महत्व आहे. दुग्धव्यवसाय विकासाच्या कार्यक्रमात आदिवासींचा सहभाग वाढावा, या हेतूने शासनाने निरनिराळ्या योजनांसाठी विशेष अनुदानाचे प्रयोजन केले आहे.

**1· दुग्ध उत्पादन, दुग्ध व्यवसाय विकास संस्था, संघ, महासंघ, यांना व्यवसाय स्थापन करण्यासाठी अर्थसहाय्य :-**

**2· सहकारी दूध संस्थांच्या सचिवांचे प्रशिक्षण :-**

**3· दुर्बल घटकातील कुटुंबांना शिक्षण देण्याचा कार्यक्रम :-**

**3· दुर्बल घटकातील कुटुंबांना शिक्षण देण्याचा कार्यक्रम :-**

आदिवासी जोडप्यांना एक आठवडयाचा दुग्ध व्यवसाय व पशुसंवर्धन संबंधीचे प्रशिक्षण देण्यात येते· असे प्रशिक्षण वर्ग दुग्धविकास खाते किंवा पशुसंवर्धन खाते यांच्या सहकारी मालकीच्या फार्मवर देण्यात येते· या प्रशिक्षणात प्रत्येक जोडप्यामागे रु·400/- प्रवासखर्च राहणे, जेवणखाण- इ·साठी येणारा खर्चही या योजनेमार्फत करण्यात येतो· अशा प्रशिक्षित जोडल्यांना जिल्हा ग्रामीण विकास योजनेखाली दुभती जनावरे खरेदी करण्याची शिफारस करण्यात येते व त्याचा पाठपुरावा करण्यात येतो·

**4· 1 वर्ष वयाच्या उच्चपैदास क्षमतेच्या पारडयांचा पुरवठा :-**

दुग्ध व्यवसाय विभागामार्फत गरजू, गरीब व होतकरू आदिवासी लाभार्थ्यांना रु·100/- इतक्या नाममात्र किंमतीत 1 वर्ष वयाच्या पारडयांचा पुरवठा केला जातो· रु·100/- भरल्यानंतर उरलेली रक्कम अनुदान म्हणून देण्यात येते· यामध्ये म्हैसाणा किंवा सुरती जातीची 1 वर्षे वयाची पारडी दिली जाते·

**5· भाकड व गाभण म्हशींसाठी अनुदान :-**

भाकड म्हशी खरेदी करून त्यांना खेडयात आदिवासींकडे पाठवावयाचे त्याकरिता शासनातर्फे अनुदान आणि बँकेकडून कर्ज घ्यावयाचे अशी ही योजना आहे· भाकड काळात त्यांना आदिवासी पाळतात आणि त्या व्यायल्यानंतर दूध द्यायला लागल्यानंतर त्या दूधाच्या उत्पन्नातून कर्जाची वसूली होते·

**6· भाकड व गाभण म्हशींसाठी वाहतूक अनुदान :-**

प्रत्येक म्हशीच्या वाहतूकीसाठी होणा-या खर्चाच्या अंतराचे प्रमाणात किंवा जास्तीत जास्त रु.300/- पैकी जो कमी असेल ती रक्कम अर्थसहाय्य म्हणून दिली जाते.

## 7. भाकड व गाभण म्हशींसाठी खावटी अनुदान :-

आदिवासींना पुरविण्यात येणा-या प्रत्येक पारडयामागे दिलेल्या दिवसापासून प्रतिदिनी रु.3.00 (तीन) याप्रमाणे पहिल्या फळणापर्यंत अशाप्रकारची खावटी वस्तुच्या स्वरुपात दिली जाते.

## 8. वैरण लागवड

जनावरांकरिता उत्तम चारा मिळावा या दृष्टीने उत्तम जातीच्या चा-यांचे बि-बियाणे किंवा संकरित नेपियर जातीच्या चा-यांची रोपे किंवा मूळे पुरविण्याचे कामही राज्य शासनाद्वारे केले जाते.

# प्रकरण 2 रे

## मूल्यमापन अभ्यासाची उद्दिष्टये व गांवे/लाभार्थी/कुटुंबे नमुना निवड पध्दती

2·1 समाजातील विविध घटकांमध्ये आदिवासी समाज हा सर्वात दुर्बल व कमकुवत घटक गणला जातो· तो शैक्षणिक व आर्थिकदृष्टया अतिशय मागासलेला आहे· त्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन निरनिराळया विभागांमार्फत विविध योजना राबवित आहे· त्यामागे आदिवासींचे जीवनमान सुधारणे व त्यांची आर्थिक पिळवणूक थांबविणे हा उद्देश आहे·

"कृषी व संलग्न सेवा" विभागाअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा लाभ आदिवासी शेतक-यांना कितपत व कशाप्रकारे होत आहे याचा मूल्यमापन अहवाल तयार करण्याच्या कामी खालील उद्दिष्टये डोळयासमोर ठेवण्यात आली आहे·

2·2 **अभ्यास अहवालासाठी उद्दिष्टये :-**

1· शासनामार्फत अल्प अत्यल्प भूधारक आदिवासी शेतक-यांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कार्यक्रमांचा त्यांचेवरील प्रभाव व परिणाम आजमाविणे·

2· आदिवासी क्षेत्रातील विशिष्ट भौगोलिक परीस्थितीनुसार योजना कार्यक्रमाचे आयोजन आहे किंवा कसे याचा शोध घेणे

3· "कृषी व संलग्न सेवा" विभागाअंतर्गत राबविलेल्या योजनांचा लाभ आदिवासींना किती प्रमाणात झाला ? याचा उहापोह करणे·

4· शेती विकास कार्यक्रम राबविताना येणा-या अडचणी तसेच कार्यक्रमामधील त्रुटे/अडचणी/विसंगती यांचे दिग्दर्शन करणे·

5· हया अनुषंगाने योजनांच्या/कार्यक्रमांच्या स्वरुपात सुयोग्य बदल सुचविणे·

2·3 **क्षेत्रीय पाहणीसाठी निवड पध्दती :-**

"कृषी व संलग्न सेवा" विभागांतर्गत राबविलेल्या योजनांच्या अभ्यासासाठी पुणे जिल्हयातील जुन्नर, आंबेगांव, खेड या तालुक्यांची व अमरावती जिल्हयांतील धारणी तालुक्याची निवड आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत येत असल्यामुळे करण्यात आली· पुणे व अमरावती

जिल्हयांत मोडणारे आदिवासी क्षेत्र व त्यातील गांवे आणि लोकसंख्या (सन 1981 च्या जनगणनेप्रमाणे) तसेच आदिवासी कुटुंबांची सांख्यिकी माहिती खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.

तक्ता क्र.2.1

पुणे व अमरावती जिल्हयातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील

गांवे/लोकसंख्या/कुटुंब

| अ.क्र. | आदिवासी उपयोजना क्षेत्र तालुके | एकूण गांवे | लोकसंख्या (1981) | | कुटुंबे (अंदाजे) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण | आदिवासी | एकूण | आदिवासी |
| 1. | जुन्नर | 65 | 2,46,425 | 44,250 | 49,285 | 8,850 |
| 2. | आंबेगांव | 56 | 1,07,746 | 32,500 | 21,549 | 6,500 |
| 3. | खेड | 27 | 2,31,886 | 28,221 | 46,377 | 5,644 |
| 4. | धारणी | 23 | 86,900 | 64,800 | 14,480 | 10,800 |
| | एकूण | 171 | 6,72,957 | 1,69,771 | 1,31,691 | 31,794 |

तक्ता क्र.2.2

पुणे व अमरावती जिल्हयातील एकूण आदिवासी व शेतकरी कुटुंबे

| अ.क्र. | आदिवासी उपयोजना क्षेत्र तालुके | कुटुंबे (1981) | | शेतकरी कुटुंबे | दारिद्रय रेषेखालील कुटुंबे |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | आदिवासी | | |
| 1. | .2. | .3. | .4. | .5. | .6. |
| 1. | जुन्नर | 49,285 | 8,850 | 3,836 | 1,729 |
| 2. | आंबेगांव | 21,549 | 6,500 | 4,390 | 2,075 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3. | खेड | 46,377 | 5,644 | -- | -- |
| 4. | धारणी | 14,480 | 10,800 | -- | -- |

आधार - बेंचमार्क सर्व्हेक्षण {कुटुंबपत्रक तक्ता क.45}

## 2.5 गांवाची निवड :-

क्षेत्रीय पाहणीसाठी निवडलेल्या गांवासंबंधी माहिती :-
पुणे जिल्हयातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जुन्नर, आंबेगांव व खेड या तालुक्यांमधून सर्वसाधारणपणे 23 गांवे क्षेत्रीय पाहणीसाठी निवडण्याचे ठरले. अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यातील 10 आदिवासी गांवाची निवड क्षेत्रीय पाहणीसाठी केली गेली. गांवाची निवड करतांना रस्त्यालगतची दुर्गम व अतिदुर्गम भागातील गांवे विचारात घेऊन नमुना पाहणीमधील गांवे निश्चित करावीत असे ठरले. त्यानुसार तालुकानिहाय निवडलेली गांवे पुढील तक्त्यात तक्ता क.2.3 मध्ये दर्शविली आहेत.

तक्ता क.2.3

सर्व्हेक्षणासाठी निवडलेली तालुकानिहाय गांवे

| अ.क्र. | आदिवासी उपयोजना क्षेत्र तालुके | एकूण गांवे | सर्व्हेक्षणासाठी निवडलेली गांवे | दळणवळणाच्या सुविधा | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रस्त्यावरील | दुर्गम भागातील | अति दुर्गम भागातील |
| 1. | जुन्नर | 65 | 9 | 6 | 1 | 2 |
| 2. | आंबेगांव | 56 | 9 | 6 | 2 | 1 |
| 3 | खेड | 27 | 5 | 3 | 2 | -- |
| 4. | धारणी | -- | 10 | 3 | -- | -- |
| | एकूण | 148 | 33 | 18 | 5 | 3 |

2·6 **लाभार्थी कुटुंबांची निवड :-**

सर्व्हेक्षणासाठी निवडलेल्या विभागांतर्गत राबविण्यात आलेल्या योजनेखाली लाभ घेतलेल्या आदिवासी लाभार्थी कुटुंबांची संख्या विचारात घेता सर्वच्या सर्व कुटुंबांना भेटी देऊन माहिती होणे वेळेच्या अभावी व क्षेत्रीय पाहणीसाठी लागणा-या कर्मचारीवृंदाच्या अपुरेपणामुळे काही लाभार्थी कुटुंबांची निवड करून सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण करण्याचे ठरविले· त्यानुसार प्रमुख योजनांतर्गत एकूण लाभार्थी व निवडलेले लाभार्थी पुढील तक्त्यात तक्ता क्र·2·4 मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहेत·

तालुकानिहाय गांवे आणि कुटुंबे व लाभार्थी

तक्ता क्र·2·4

| अ·क्र· | तालुका | अनु क्र· | गांवाचे नांव | निवडलेली लाभार्थी कुटुंबे | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| ·1· | ·2· | 3 (अ) | 3 (ब) | ·4· | ·5· |
| 1· | जुन्नर | 1 | गोद्रे | 5 | |
| | | 2 | आंबोली | 4 | |
| | | 3 | पूर | 5 | |
| | | 4 | सितेवाडी | 2 | |
| | | 5 | चावंड | 4 | |
| | | 6 | शिरोली | 1 | |
| | | 7 | तांबे | 1 | |
| | | 8 | घंगाळदरे | 3 | |
| | | 9 | सोनावळे | 1 | |
| | | 9 | एकूण | 26 | 33·76 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2. | आंबेगांव | 1 | गंगापूर खुर्द | 2 | |
| | | 2 | गंगापूर बु. | 1 | |
| | | 3 | उगलेवाडी | 1 | |
| | | 4 | राजेवाडी | 3 | |
| | | 5 | राजपूर | 3 | |
| | | 6 | तळेघर | 3 | |
| | | 7 | भाकोली | 1 | |
| | | 8 | गोहे बुद्रुक | 4 | |
| | | 9 | पिंपळगांव | 1 | |
| | | 9 | एकूण | 19 | 24.67 |
| 3. | खेड | 1 | शेंदुर्ली | 2 | |
| | | 2 | घोटवडी | 3 | |
| | | 3 | टोकवडे | 1 | |
| | | 4 | धामणगांव खु. | 2 | |
| | | 5 | कडूस | 3 | |
| | | | एकूण | 11 | 14.28 |
| 4. | धारणी | 1 | राजपूर | 3 | |
| | | 2 | दुनी | 1 | |
| | | 3 | चाकरी | 1 | |
| | | 4 | चुंटया | 2 | |
| | | 5 | धुळघाट | 2 | |
| | | 6 | शेरा | 2 | |
| | | 7 | कलमखार | 1 | |
| | | 8 | साडीवाडी | 2 | |
| | | 9 | वैरागड | 2 | |
| | | 10 | गोंडवाडी | 4 | |
| | | 10 | | 21 | 27.27 |
| | एकूण | 33 | | 77 | 100.00 |

2.7 लाभार्थी कुटुंबांची निवड करतांना प्रत्येक विभागामधील लाभार्थींना प्रतिनिधीत्व मिळेल याची दखल घेण्यात यावी, असे ठरले. तसेच आदिवासी जमातीनिहाय व बिगर आदिवासी जमातीतील लाभार्थी निवडून त्यांची माहिती संकलित करण्याचे ठरविण्यात आले.

"कृषी व संलग्न सेवा" विभागांतर्गत विविध विभागाखाली जमातीनिहाय निवडलेल्या लाभार्थींची माहिती पुढील तक्त्यात सादर केली आहे.

उपविभागवार जमातीनिहाय सर्व्हेक्षणासाठी निवड केलेले लाभार्थी

तक्ता क्र.2.5

| अ.क्र. | विभाग | निवडण्यात आलेल्या लाभार्थी संख्या | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | आदिवासी जमातीतील (महादेव कोळी, ठाकर, कोरकू) | सर्वसाधारण लोकसंख्या गटातील | |
| .1. | .2. | .3. | .4. | .5. |
| 1. | पीकसंवर्धन | 17 | -- | 17 |
| 2. | दुग्धव्यवसाय | 28 | -- | 28 |
| 3. | पशुसंवर्धन | 14 | -- | 14 |
| 4. | फलोत्पादन | 14 | 4 | 18 |
| | एकूण | 73 | 4 | 77 |
| | टक्केवारी | 94.79 | 4.19 | 100 टक्के |

2.8 प्रत्येक विकास कार्यक्रम तथा योजनेमध्ये लाभार्थींची योग्य निवड करण्याच्या दृष्टीने लाभार्थींना प्रमुख विभागांतर्गत दिलेल्या योजनांचा अभ्यास करुन लाभार्थींनी ज्या योजना/कार्यक्रमांचा जास्तीत जास्त फायदा घेतला असेल अशा प्रत्येक योजनेला प्राधान्य देऊन आदिवासी व बिगर आदिवासी लाभार्थींची क्षेत्रीय पाहणीसाठी निवड करण्यात आली. सदर निकषांतर्गत प्रत्येक तालुक्यातून योजनानिहाय निवड केलेल्या लाभार्थींची माहिती पुढील तक्ता क्र.2.6 मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क्र.2.6

## तालुकानिहाय तसेच योजनानिहाय लाभार्थ्यांचे वर्गीकरण

| अ.क्र. | योजनेचे नांव | तालुकानिहाय लाभार्थीचे वर्गीकरण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जुन्नर | आंबेगांव | खेड | धारणी | एकूण | टक्केवारी |
| 1. | .2. | .3. | .4. | .5. | .6. | .7. | .8. |
| | **(अ) पीकसंवर्धन** | | | | | | |
| 1. | डस्टरपुरवठा | 1 | -- | -- | -- | 1 | |
| 2. | वीजपंप पुरवठा | 1 | 3 | -- | 1 | 5 | |
| 3. | बैलगाडी/बैलजोडी | -- | 2 | 1 | 5 | 8 | |
| 4. | रासायनिक खतपुरवठा | 3 | 1 | 1 | -- | 5 | |
| 5. | जमीन सपाटीकरण | 1 | 3 | -- | -- | 4 | |
| | एकूण | 6 | 9 | 2 | 6 | 23 | 30 टक्के |
| | **ब) दुग्धव्यवसाय** | | | | | | |
| 1. | एक वर्षे वयाची पारडी पुरवठा | 6 | 1 | -- | -- | 7 | |
| 2. | गाभण म्हैस पुरवठा | 4 | 5 | 4 | 8 | 21 | |
| | एकूण | 10 | 6 | 4 | 8 | 28 | 36.5 टक्के |
| | **क) पशुसंवर्धन** | | | | | | |
| 1. | वळूपुरवठा | 1 | -- | -- | -- | 1 | |
| 2. | कुक्कुटपालन | -- | -- | -- | 4 | 4 | |
| | एकूण | 1 | -- | -- | 4 | 5 | 6.5 टक्के |

| अ.क्र. | योजनेचे नांव | तालुकानिहाय लाभार्थीचे वर्गीकरण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जुन्नर | आंबेगांव | खेड | धारणी | एकूण | टक्केवारी |
| | **ड) फलोत्पादन** | | | | | | |
| 1. | घरकुल योजना | 1 | 1 | 2 | -- | 4 | |
| 2. | भांडवली अनुदान | 8 | 3 | 3 | 3 | 17 | |
| | एकूण | 9 | 4 | 5 | 3 | 21 | 27 टक्के |
| | **एकूण** | 26 | 19 | 11 | 21 | 77 | 100 टक्के |

2.9 **क्षेत्रीय पाहणीत भरावयाची पत्रके :-**

"कृषी व संलग्न सेवा" विभागांतर्गत राबविण्यात आलेल्या योजनांचा लाभ घेतलेल्या आदिवासी कुटुंबांकरिता भरण्यासाठी प्रपत्र 1 तयार करण्यात आले. याशिवाय सदर योजनांची अंमलबजावणी करणारे शासकीय अधिकारी यांचेसाठी प्रपत्र क्र.2 तयार करण्यात आले. त्यामध्ये राबविलेल्या योजनासंबंधी त्यांचे अभिप्राय तसेच योजनेच्या अंमलबजावणीमधील त्रुटी/अडथळे इत्यादीबाबतची माहिती नोंदवावयाची आहे. त्याचप्रमाणे आदिवासी लाभार्थ्यांच्या विकासासाठी कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्था यांचे योजनेबाबतचे अभिप्राय देखील नोंदवावयाचे आहेत. कारण आदिवासींच्या विकासामध्ये शासनाबरोबरच स्वयंसेवी संस्थांचा सहभागही तितकाच महत्वाचा व मोलाचा आहे, असे शासनास वाटते. सारांश, क्षेत्रीय पाहणीमध्ये वैयक्तिक लाभार्थी तसेच योजनेचे अंमलबजावणी अधिकारी व स्वयंसेवी संस्थां यांचेकरिता अनुक्रमे प्रपत्र क्र.1 व प्रपत्र क्र.2 भरण्याचे ठरविले आहे.

# प्रकरण ३ रे

## उदाहरणादाखल काही वैयक्तिक लाभार्थी प्रकरणांचा अभ्यास

§ Case studies §

३•१ "कृषी व संलग्न सेवा" विभागांतर्गत राबविण्यात आलेल्या योजनांखालील लाभार्थींचा एकत्रित अभ्यासाशिवाय काही वैयक्तिक प्रकरणांचा "योजना निहाय" अभ्यास करण्याचे ठरविल्यामुळे काही निवडक प्रकरणांच्या अभ्यासासाठी खालील प्रमुख उद्दिष्टये ठरविण्यात आली•

१• ज्या आदिवासी शेतक-यांनी योजनेचा प्रत्यक्ष लाभ घेतला त्यांच्यावर झालेल्या योजनांचा प्रभाव/परिणामाची स्थिती तपासणे•

२• सुधारीत बी-बियाणे, खते इ•चा वापर तसेच कुटुंबांस उत्पन्न मिळवून देणा-या योजनांकडील त्यांचा कल अभ्यासणे•

३• योजना निवडतांना आदिवासी लाभार्थी तसेच अंमलबजावणी अधिकारी यांना येणा-या अडचणींचा अभ्यास करणे•

४• राबविलेल्या योजनांचे प्रशासकीय कामकाज स्वरुप स्थिती तपासणे•

५• आदिवासींकरिता राबवावयाच्या योजनांबाबत चांगल्या रितीने राबविण्यासाठी आदिवासींची मते/अभिप्राय•

६• आदिवासी लाभार्थींच्या आर्थिक स्थितीत सुधारणा, उत्पन्नाची पातळी वाढली किंवा कमी झाली याचा शोध घेणे•

७• नसल्यास, त्यामागील कारणे कोणती याचा मागोवा घेणे•

३•२ कृषी व संलग्न सेवा विभागांतर्गत प्रमुख विभागनिहाय योजना व तालुकानिहाय व्यक्तीगत प्रकरणांचा सविस्तर विश्लेषणात्मक टिप्पणी खालील तक्त्यात दर्शविलेल्या गांवातील लाभार्थींकरिता तयार केली आहे•

महाराष्ट्र राज्याचे खर्चानुसार कृषीबाबत सातव्या (7 व्या) पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्टय खालील तक्त्यात दर्शविले आहे.

तक्ता क्र. 3.1

महाराष्ट्र राज्यातील कृषीबाबत विकासाचे आयोजन

| अ.क्र. | विकासाचे शीर्ष | आदिवासी उपयोजनेचा भाग | |
|---|---|---|---|
| | | 7 वी पंचवार्षिक योजना | शेकडा खर्च |
| | **कृषी व संलग्न सेवा :-** | | |
| 1. | वनीकरण आणि वन्यप्राणी | 22,69,58 | 33.95 |
| 2. | पीकसंवर्धन | 14,63,44 | 21.89 |
| 3. | फलोत्पादन | 4,46,16 | 6.67 |
| 4. | दुग्धशाळा व विकास | 8,50,00 | 12.71 |
| 5. | सहकार | 7,50,90 | 11.23 |
| 6. | पशु संवर्धन | 5,66,25 | 8.47 |
| 7. | मृद व जलसंधारण | 1,75,00 | 2.62 |
| 8. | मत्स्यव्यवसाय | 1,60,00 | 2.39 |
| 9. | अन्न साठवण आणि वखारी | 5,00 | 0.07 |
| | एकूण | 66,86,63 | 100.00 |

वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, वनीकरण आणि वन्यप्राणी या शीर्षावर सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये सर्वात जास्त म्हणजे 33.95 टक्के खर्चाची तरतूद केली होती. तर शेतक-यांना अत्यंत फायदेशीर ठरणारी पीकसंवर्धन व दुग्धशाळा विकास या योजनांवर अनुक्रमे 21.89 टक्के व 12.71 टक्के खर्चाची तरतूद करण्यात आली होती. सहकारावर 11.23 टक्के खर्चाची तरतूद शासनाने केली होती.

तक्ता क्र .३२

| अ.क्र. | तालुका | गांवाचे नांव | विभाग | योजनेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| .1. | .2. | .3. | .4. | .5. |
| 1. | जुन्नर | 1 पूर | फलोत्पादन | काजू/आंबा/बोर कलमे वाटप |
| | | 2 गोद्रे | फलोत्पादन | काजू/आंबा/बोर कलम वाटप |
| | | | पीकसंवर्धन | विद्युतपंप पुरवठा |
| 2. | आंबेगांव | 1 गोहे बु. | दुग्धव्यवसाय | 1 वर्ष वयाची पारडी |
| | | 2 तळेघर | पीकसंवर्धन | जमीन सपाटीकरण व जुनी विहिर दुरुस्ती |
| | | 3 राजपूर | पीकसंवर्धन | ---"---- |
| 3. | खेड | 1 घोटवडी | पशुसंवर्धन | बैलगाडी/बैलजोडी पुरवठा |
| | | | पशुसंवर्धन | जर्सी गायक पुरवठा |
| | | 2 शेंदुली | दुग्धव्यवसाय | दुभती म्हैस पुरवठा |
| 4. | धारणी | 1 गोंडवाडी | दुग्धव्यवसाय | गाभण म्हैस पुरवठा |
| | | | पशुसंवर्धन | बैलगाडी/बैलजोडी पुरवठा |
| | | | कुक्कुटपालन | कोंबडीची पिल्ले |
| | | 2 धुळघाट | पशुसंवर्धन | बैलजोडी/बैलगाडी पुरवठा |
| | | | कुक्कुटपालन | कोंबडीची पिल्ले |

3.3 जुन्नर तालुक्यातील पूर येथील महादेव कोळी जमातीचे लाभार्थी शिक्षित असून त्यांचा मुख्य व्यवसाय शेती. या व्यतिरिक्त यांचा अन्य दुय्यम व्यवसाय नाही.

त्यांच्या मालकीची एकूण 3 एकर जमीन असून त्यांचे वार्षिक उत्पन्न रु.1200/- इतके आहे. उत्पन्नानुसार त्यांचा समावेश दारिद्रय रेषेखालील गटात होतो. उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांना कृषी व संलग्न सेवेअंतर्गत 1985 मध्ये 100 टक्के अनुदानावर "फलोत्पादन" योजनेखाली रु.500/- किंमतीची फळझाडांची 100 आंबा कलमे शासनामार्फत पुरविण्यात आली. ही योजना वस्तु स्वरुपात असून लाभार्थीने आपल्या शेतात लावली असून त्यांची वाढ होत आहे.

सदर कलमे शेतामध्ये लावली असून त्यापासून उत्पन्न हाती यावयास बराच कालावधी लागणार आहे, असे मुलाखत घेतली असता लाभार्थ्याने माहिती दिली. तसेच एकूण 100 आंबा कलमांपैकी 70 आंबा कलमे जगली असून उर्वरित 30 कलमे पाण्याअभावी जगू शकली नाहीत. असेही लाभार्थ्याने सांगितले. झाडे कशी लावावीत याविषयी सल्ला व मार्गदर्शन मिळाले. भविष्य काळामध्ये या कलमांपासून लाभार्थ्याला चांगलाच फायदा होईल, अशी लाभार्थ्यास खात्री वाटते.

या योजनेमध्ये लाभार्थ्यांना लाभ दिल्यानंतर पीक हाती येण्यास व त्यापासून आर्थिक उत्पन्न सुरू होण्यास बराच कालावधी लागतो त्यामुळे मोठया प्रमाणावर लाभ घेण्यास लाभार्थी फारसे उत्सुक नसतात. तसेच झाडे दिल्यानंतर ती कशी लावावी याचे मार्गदर्शन होते पण झाडांची वाढ कशी झाली किंवा किती झाडे जिवंत आहेत ? रोग पडला किंवा कसे ? व औषध फवारणी याविषयी शेतक-यांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे. तेव्हा या बाबींचाही पाठपुरावा संबंधित विभागाने करणे अगत्याचे आहे. योजनेचा लाभ दीर्घ काळानंतर बरेच वर्षे मिळत राहणार असल्याने लाभार्थींनी सुरवातीच्या काळात आंतरपिके काढून उत्पन्न मिळवावे.

3.4 जुन्नर तालुक्यातील गोद्रे येथील महादेव कोळी जमातीचे लाभार्थी निरक्षर असून त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे.

यांच्या मालकीची 3 एकर कोरडवाहू व एक एकर बागायत जमीन अशी एकूण 4 एकर जमीन आहे. यांचे वार्षिक उत्पन्न रु.1200/- इतके आहे. उत्पन्नानुसार दारिद्रय रेषेखालील गटात त्यांचा समावेश होतो. वार्षिक उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांना "फलोत्पादन" या योजनेखाली 100 टक्के अनुदानावर रु.2,500/- किंमतीची निलगिरी, सुबाभूळ, बोर व आंबा अशी 500 कलमे पुरविण्यात आली. हा लाभ वस्तु स्वरुपात मिळाला असून लाभार्थीने आपल्या

शेतात कलमे लावली आहेत. तसेच त्यांची वाढ चांगली होत असल्याचेही लाभार्थीने सांगितले.

सदर योजनेमध्ये मिळालेली कलमे लाभार्थीने आपल्या शेतात लावली आहेत. परंतू त्यापासून आर्थिक उत्पन्न मिळण्यास अद्याप सुरवात झालेली नाही. भविष्यकाळात या लाभापासून आर्थिक वाढ होईल अशी लाभार्थ्यास खात्री वाटते.

या योजनेमध्ये लाभधारकाला आर्थिक उत्पन्न मिळण्यास 3 ते 4 वर्षाचा कालावधी लागतो व इतका काळ धीर धरण्यात आदिवासी शेतकरी मानसिकदृष्टया तयार नसतो. त्वरीत उत्पन्न मिळवून देणा-या योजनांचा लाभ घेण्यास आदिवासी शेतकरी उत्सुक असतो.

रोपे/कलमे दिल्यानंतर त्यांच्या लागवडीसंबंधी मार्गदर्शन केले जाते, परंतू त्यावर औषध फवारणी, झाडे जिवंत आहे का, त्यांची वाढ याविषयी संबंधित अधिका-यांकडून पाठपुरावा होत नसल्याचे जाणवते. योजनेच्या सुयोग्य प्रतिसादाकरिता योजना अंमलबजावणी अधिका-यांनी योग्य ती काळजी घेतली पाहिजे तरच लाभार्थींना योजनेपासून लाभ मिळू शकेल.

3.5 गोद्रे ता. जुन्नर, जि.पुणे येथील महादेव कोळी जमातीच्या लाभार्थीचे प्राथमिक इयत्तेपर्यंत शिक्षण झाले आहे. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. शेती व्यतिरिक्त अन्य दुसरा दुय्यम व्यवसाय नाही.

त्यांच्या मालकीची एकूण 7 एकर जमीन आहे त्यापैकी 1 एकर जमीन बागायत आहे. त्यांचे एकूण वार्षिक उत्पन्न रु.3,600/- इतके आहे. उत्पन्न निकषानुसार त्यांचा दारिद्रय रेषेखालील गटामध्ये समावेश होतो.

आदिवासी विकास योजनेअंतर्गत 1988-89 मध्ये 100 टक्के अनुदानावर लाभार्थ्यास विद्युतपंप देण्यात आला. शासनाची ही योजना वस्तु स्वरुपात राबविण्यात येते.

सदर योजनेचा लाभ लाभार्थ्यास दिला जात असला तरी लाभार्थ्यांच्या आर्थिक उत्पन्नामध्ये मात्र वाढ झालेली नाही. याचे कारण विद्युत पंपाचे फिटींग अद्याप करुन मिळालेले नाही. त्यामुळे 1988-89 पासून विद्युतपंप घरामध्ये पडून आहे. विद्युत पंपाचा शेतक-याला शेतीसाठी अजिबात उपयोग झाला नाही. पंपाचे फिटींग करुन दिल्यानंतर शेतक-याला त्याचा आर्थिक फायदा होईल.

आदिवासी विकास विभागामार्फत देण्यात आलेला विद्युत पंप विहिरीवर फिटींग

करून मिळाला नाही म्हणून उपयोगात आणता आला नाही· योजनेचा प्रत्यक्ष लाभ दिल्यानंतर योजनेचा पाठपुरावा ( Follow up ) होत नसल्याचे जाणवते· संबंधित अधिका-यांनी वेळीच कार्यवाही करणे योजनेच्या/कार्यक्रमाच्या फलश्रुतीच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे·

3·6 गोद्रे ता·जुन्नर, जि·पुणे येथील हे लाभार्थी महादेव कोळी जमातीचे असून ते अशिक्षित आहेत· त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे·

त्यांच्या मालकीची एकूण 10 एकर कोरडवाहू जमीन आहे· त्यांचे वार्षिक उत्पन्न रु·2500/- इतके आहे· त्यांच्या कुटुंबांचा दारिद्रय रेषेखालील गटामध्ये समावेश होतो·

आदिवासी विकास योजनेअंतर्गत 1988-89 मध्ये 100 टक्के अनुदानावर त्यांना विद्युतपंप देण्यात आला·

सदर योजनेचा लाभ लाभार्थ्यास देऊनही त्याच्या आर्थिक उत्पन्नामध्ये वाढ झालेली नाही याचे कारण विद्युत पंपाचे फिटींग करून दिले गेले नाही· त्यामुळे विद्युत पंप घरामध्ये अद्याप पडून आहे· फिटींग करून दिल्यानंतरच आर्थिक उत्पन्नामध्ये फायदा होईल, असे लाभार्थीने मुलाखतीमध्ये सांगितले·

आदिवासी विकास विभागामार्फत देण्यात आलेला विद्युत पंप केवळ विहिरीवर फिटींग करून न मिळाल्याने उपयोगात आणता आला नाही· सदर योजनांची अंमलबजावणी योग्य रितीने होत नसल्याचे दिसते· लाभधारकाला योजनेअंतर्गत आवश्यक असलेली सर्व मदत एकत्रितरित्या उपलब्ध करून दिली पाहिजे· योजनेच्या यशस्वीतेकरिता आवश्यक गोष्टींचा पाठपुरावा करणे अगत्याचे वाटते·

3·7 रा·गोहे बु·ता·आंबेगांव, जि·पुणे येथील एक लाभार्थी महादेव कोळी जमातीचे कुटुंब शिक्षित असून त्यांचा मुख्य व्यवसाय शेती व दुय्यम व्यवसाय म्हणून ते स्वस्त धान्याचे दुकान चालवित आहेत·

त्यांच्या मालकीची 9 एकर कोरडवाहू जमीन आहे· तसेच त्यांचे वार्षिक उत्पन्न रु·2000/- इतके आहे· त्यांचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या दारिद्रय रेषेखाली येत असल्याने त्यांना "कृषी व संलग्न सेवा" योजनेअंतर्गत सन 1988-89 मध्ये 100 टक्के अनुदानावर "दुग्धव्यवसाय" या योजनेअंतर्गत 1 एक वर्ष वयाची रु·750/- किंमतीची पारडी त्यांना घरपोच मिळाली आहे· प्रस्तुतच्या योजनेखाली पारडीचे पोषण करण्यासाठी पारडी दिल्यापासून सुरवातीचे 90 दिवस खाद्य ( खावटी ) पुरविण्यात येते· त्यांना खावटी देखील मंजूर करण्यात आली

आहे. या पारडीचे शास्त्रोक्त पालनपोषण कसे करावे या संदर्भात दुग्धव्यवसाय विभागाकडून 7 दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. याशिवाय वेळोवेळी तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन देण्यात आल्याचे लाभार्थींनी सांगितले. सदर योजनेखाली मिळालेली पारडी लाभार्थीकडे असून अजून पारडीही लहान आहे.

या योजनेमध्ये लाभार्थींना प्रशिक्षण व कृषी विस्तार अधिका-यांचा वेळोवेळी सल्ला व मार्गदर्शन उपयुक्त ठरत असल्याचे लाभार्थ्याने मुलाखतीमध्ये स्पष्ट केले.

3.8 तळेघर, ता.आंबेगांव, जि.पुणे येथील महादेव कोळी या अनुसूचित जमातीच्या लाभार्थीचे प्रकरणे तपासले. त्यांचा व्यवसाय शेती हा असून अन्य दुय्यम व्यवसाय ते करीत नाहीत. त्यांचे शिक्षण माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण इतके झाले आहे.

त्यांचे वार्षिक उत्पन्न रु.4000/- इतके आहे. त्यांच्या मालकीची 22 एकर कोरडवाहू जमीन आहे. त्यामुळे दारिद्रय रेषेच्या गटामध्ये त्यांचा समावेश होतो.

"कृषी व संलग्न सेवा" योजनेअंतर्गत सन 1989=90 मध्ये 50 टक्के अनुदानावर "पीकसंवर्धन" योजनेखाली जमीन सपाटीकरण व जुनी विहीर दुरुस्त करण्यासाठी एकूण रु.12,000/- या खर्चाची योजना स्विकारली. जमीन सपाटीकरण योजनेखाली लाभार्थ्याला 22 एकर जमीन सपाट करुन मिळाली. शिवाय जुनी विहिर दुरुस्त करुन घेता आली. दोन्ही योजनांचा एकत्रित लाभ लाभधारकाला चांगल्या झाल्याचे लाभधारकांने सांगितले.

सदर योजनेपूर्वी त्यांना केवळ शेतीमधून मिळणा-या रु.4000/- उत्पन्नावर उपजिविका करावी लागत असे. परंतू बुलडोझरने जमीन सपाटीकरण केल्यामुळे जास्त प्रमाणात जमीन लागवडीखाली आली व जास्त पीक घेणे सोयीचे झाले. तसेच जुनी विहीर दुरुस्त करुन दिल्यामुळे शेतीचे उत्पन्नामध्ये रु.4000/- ते रु.5000/- इतके उत्पन्न वाढून अपेक्षित फायदा होईल असे लाभार्थ्यास वाटले. मुलाखतीमध्ये लाभार्थ्याने आपले विचार मांडले व सांगितले की, विहिरीसाठी मिळणारे अनुदान अपुरे आहे. कर्जाऊ रक्कम कमी मिळते त्याऐवजी शासनामार्फत नवीन विहिर खोदून मिळाली तर बरे होईल.

या योजनेखाली लाभार्थ्यांना द्यावयाच्या अनुदान रकमेत वाढ करण्यात यावी, म्हणजे जास्तीत जास्त शेतकरी याचा फायदा घेतील. परिणामतः जास्त जमीन लागवडीखाली येईल. सारांश या योजनेचे स्वरुपात थोडासा बदल केला तर आणखी लाभार्थी योजनेचा फायदा घेऊ शकतील.

3.9 रा.राजपूर, ता.आंबेगांव, जि.पुणे येथील महादेव कोळी जमातीचे एक लाभार्थी यांचा मुख्य व्यवसाय शेती व दुय्यम व्यवसाय म्हणून ते हॉटेल चालवितात. कुटुंब सुशिक्षित आहे.

त्यांच्या मालकीची 2 एकर कोरडवाहू जमीन आहे. तरीपण त्यापासून त्यांना रु.3500/- एवढे वार्षिक उत्पन्न मिळते शेतीला जोडधंद्याची जोड असल्यामुळे सदर लाभार्थी दारिद्रय रेषेखालील गटामध्ये मोडत नाही.

"कृषी व संलग्न सेवा" अंतर्गत सन 1988-89 मध्ये 50 टक्के अनुदानावर "पीकसंवर्धन" योजनेखाली रु.9,000/- मिळाले. बुलडोझरने जमीन सपाट केली व विहिर आणखी खोल खोदून घेतली. अशा दोन योजनांचा लाभधारकाने लाभ घेतला. या दोन्ही योजना सेवा स्वरुपात असून लाभार्थ्यास जमीन सपाट करुन मिळाली तसेच विहिर खोदून मिळाली. वरील योजनांचा लाभधारकाला चांगला उपयोग होऊन आर्थिक उत्पन्नामध्ये वाढ झाल्याचे लाभधारकाने मुलाखतीत सांगितले.

सदर योजनेचा लाभ घेण्यापूर्वीपासून लाभधारक हॉटेल व्यवसाय करीत आहे. जमीन सपाट करुन मिळाल्यामुळे लागवडीखालील क्षेत्र वाढले व शेतजमीनीला पाणी मिळाले. त्यामुळे भातांचे पिक वाढून आर्थिक उत्पन्नामध्ये वाढ झाली. सर्वसाधारणपणे रु.1000/- वार्षिक उत्पन्न वाढण्याची अपेक्षा लाभधारकांने गृहित धरली आहे.

सदर योजनेमध्ये लागवडीखालील क्षेत्र वाढून लाभधारकांच्या आर्थिक उत्पन्नामध्ये वाढ होते. तथापि, सदर योजनेखालील अनुदानात वाढ करण्यात यावी, म्हणजे अधिकाधिक लाभार्थी त्याचा लाभ घेतील.

3.10 रा.घोटवडी, ता.खेड, जि.पुणे येथील महादेव कोळी जमातीचे लाभार्थी कुटुंबात बहुतेक शिक्षित, त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. कुटुंब शेती व्यतिरिक्त अन्य दुसरा दुय्यम व्यवसाय करीत नाही.

त्यांची एकूण 3.5. एकर कोरडवाहू व अर्धा एकर बागायत अशी एकूण 4 एकर जमीन आहे. त्यांचे वार्षिक उत्पन्न रु.2000/- इतके आहे. त्यामुळे त्यांचा दारिद्रय रेषेखालील गटामध्ये समावेश होतो.

"कृषी व संलग्न सेवा" या योजनेअंतर्गत सन 1988-89 मध्ये 50 टक्के अनुदानावर "पशुसंवर्धन" या योजनेअंतर्गत त्यांना रु.4000/- किंमतीची बैलगाडी व रु.4000/- किंमतीची बैलजोडी मिळाली. शासनाची ही योजना

वस्तू स्वरूपात असल्याने शासनामार्फत बैलगाडी तयार करून देण्यात आली व बैलजोडी खरेदी करून देण्यात आली.

सदर योजनेचा लाभार्थ्यास काहीही फायदा झाला नाही. त्यांचे कारण "पशुसंवर्धन" या योजनेमध्ये त्यांना मिळालेली बैलजोडी रोगाने मेली तर बैलगाडी मोडून गेली, असे त्यांनी सांगितले. लाभ मिळाल्यानंतर थोड्याच दिवसात त्यांचे नुकसान झाले पर्यायाने उत्पन्नात वाढ झाली नाही.

"पशुसंवर्धन" योजनेखाली दिली गेलेली बैलजोडी ही निकृष्ट प्रतीची होती, असे लाभार्थीचे म्हणणे. तसेच बैलगाडी तयार करण्यासाठी वापरलेले लाकूड हलक्या प्रतीचे होते. त्यामुळे योजनेचा लाभ मिळूनही आर्थिक उत्पन्नात वाढ झालेली नाही. या योजनेखाली लाभार्थ्यांना आवश्यक असलेले तांत्रिक मार्गदर्शन न मिळाल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले तेव्हा सदर योजनेखाली दिल्या गेलेल्या वस्तु या चांगल्या प्रतीच्या आहेत किंवा कसे यांची अंमलबजावणी अधिका-यांनी पाहणी करणे जरूरीचे आहे. लाभार्थ्यास त्याचा बरोबर उपयोग झाला आहे का याचा पाठपुरावा होत नसल्याचे जाणवते.

3.11 पुणे जिल्ह्यातील घोटवडी, ता.खेड, जि.पुणे येथील महादेव कोळी जमातीचे एक लाभार्थी. शालांत परीक्षेपर्यंत शिक्षण झाले. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. ते नोकरी करतात.

त्यांच्या मालकीची एक एकर कोरडवाहू जमीन असून एकूण वार्षिक उत्पन्न रु.2900/- इतके आहे. एकूण वार्षिक उत्पन्नानुसार दारिद्र्य रेषेखालील गटात त्यांचा समावेश होतो. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न थोडे असल्याने त्यांना "कृषी व संलग्न सेवा" अंतर्गत सन 1990 मध्ये 100 टक्के अनुदानावर "दुग्धव्यवसाय" योजनेखाली जर्सी गाय मिळाली. शासनाची ही योजना वस्तु स्वरूपात आहे. सध्या जर्सी गाय त्यांच्याजवळ आहे. तसेच त्यांना दुभत्या जनावरांची निगा कशी राखावी, याविषयी प्रशिक्षण मिळालेले आहे. या प्रशिक्षणाचा त्यांना चांगला उपयोग झाला असे त्यांनी सांगितले. गाईबरोबर त्यांना 7 पोती खाद्य खावटी मिळाली होती.

सदर योजनेपूर्वी त्यांना केवळ शेतीमधून मिळणा-या उत्पन्नावर उपजीविका करावी लागत असे. परंतू दुग्धव्यवसायासाठी मिळालेल्या जर्सी गाईमुळे त्यांच्या वार्षिक उत्पन्नात रु.400/- नी वाढ झाल्याचे त्यांनी मुलाखतीत सांगितले. तसेच जनावरांच्या डॉक्टरांचा त्यांना वेळोवेळी सल्ला व उपयुक्त मार्गदर्शन मिळाल्याचेही त्यांनी सांगितले. लाभार्थ्याने गाईची व्यवस्था चांगली ठेवल्याचे आढळले. सध्या गाई दूध देते, त्यामुळे यापुढेही लाभार्थ्याच्या उत्पन्नात वाढ होत

राहील, असे लाभार्थ्याला खात्री वाटते.

या योजनेसाठी लाभार्थींना आवश्यक असलेले प्रशिक्षण "दुग्धव्यवसाय" विभागाकडून दिले गेले. वेळोवेळी सल्ला व मार्गदर्शन कृषी विकास अधिकारी व जनावरांच्या डॉक्टरांकडून देण्यात येते. त्यामुळे या योजनेचा लाभ अधिक असल्याचे लाभार्थी मान्य करतात.

3.12 खेड तालुक्यातील शेंदुर्ली येथील महादेव कोळी जमातीचे लाभार्थी त्यांचा मुख्य व्यवसाय शेती तर दुय्यम व्यवसाय दुधदुभते व शेतमजूरी.

त्यांच्या मालकीची 5 एकर कोरडवाहू जमीन असून त्यांचे वार्षिक उत्पन्न रु.900/- आहे. कुटुंबांचे उत्पन्न थोडे असल्याने त्यांनी "कृषी व संलग्न सेवा" अंतर्गत सन 1990 मध्ये 50 टक्के अनुदानावर "दुग्धव्यवसाय" योजनेखाली रु.5000/- किंमतीची म्हैस विकत घेतली. शासनाची ही योजना वस्तु स्वरूपात असल्याने त्यांना शासनामार्फत म्हैस पुरविण्यात आली. सध्या त्यांच्याकडे ती म्हैस दूध देत आहे.

सदर योजनेपूर्वी त्यांना केवळ शेतीमधून मिळणा-या उत्पन्नावर उपजीविका करावी लागे. परंतू दुग्धव्यवसायासाठी मिळालेल्या म्हशीमुळे उत्पन्नात वर्षाला रु.300/- इतकी वाढ झाल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या उत्पन्नात यापुढेही सतत वाढ होत राहील याबद्दल त्यांना खात्री वाटते. या योजनेखाली लाभार्थ्यांना आवश्यक असलेले तांत्रिक मार्गदर्शन न मिळाल्याचे त्यांचेकडून सांगण्यात आले. तेव्हा योजनेंअंतर्गत आदिवासी लाभार्थ्यांना द्यावयाचे सर्व फायदे संबंधित विभागाकडून देण्याची नितांत गरज आहे. योजनेचा पाठपुरावा

होत नसल्याचे जाणवते.

3.13 अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यातील गोंडवाडी येथील कोरकू जमातीचे लाभार्थी. त्यांचा मुख्य व एकमेव व्यवसाय शेती हाच आहे. त्यांच्या मालकीची साडेतीन एकर कोरडवाहू जमीन असून त्यांचे वार्षिक उत्पन्न सुमारे रु.2000/- इतके आहे. त्यांच्या या उत्पन्नावर कुटुंबातील पाच व्यक्ती अवलंबून आहेत. 1992 साली "जीवनधारा" योजनेअंतर्गत शासनामार्फत त्यांच्या शेतात विहीर खणण्यास घेतली गेली. दीड पुरुष खोल (अंदाजे 9-10 फूट) खणूनही पाणी न लागल्यामुळे हे काम अर्धवट टाकून देण्यात आले. तसेच ही विहिर खड्डा न बुजविल्यामुळे तेवढी जमीन वाया तर गेलीच शिवाय रात्रीच्या वेळी त्यात जनावरे, माणसे पडण्याचा धोकाही निर्माण झाला. वरील सर्व बाबीमुळे संबंधित लाभार्थी नाराज दिसला.

3•14 धारणी तालुक्यातील गोंडवाडी येथील कोरकू जमातीचा आणसो एक लाभार्थी यांच्या कुटुंबात एकूण सात सदस्य असून त्यांच्या मालकीची चार एकर कोरडवाहू जमीन आहे• या कुटुंबांचा मुख्य व्यवसाय शेती असून दुय्यम व्यवसाय शेतमजूरी हा आहे• या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न अंदाजे रु•2000/- ते रु•2500/- आहे• या कुटुंबांच्या उत्पन्नात आर्थिक वाढ व्हावी, या दृष्टीने 1990 साली या कुटुंबाला जोडधंद्यासाठी "कुक्कुटपालन" योजनेअंतर्गत कोंबडीची एक दिवस वयाची 15 पिल्ले देण्यात आली• पण त्यांचे संगोपन कसे करावे याचे प्रशिक्षण न मिळाल्यामुळे सर्व पिल्ले काही काळानंतर मरून गेली• त्यामुळे या योजनेपासून या कुटुंबाला काहीही आर्थिक लाभ झाला नाही• या पाड्यात या योजनेअंतर्गत ज्या लाभार्थ्यांना कुक्कुटपालनासाठी कोंबडीची पिल्ले मिळाली, त्यांचा अनुभव थोड्याफार फरकाने सारखाच आढळला•

3•15 धारणी तालुक्यात (जि•अमरावती) कलमसार येथील एक कोरकू जमातीचा लाभार्थी याच्या कुटुंबांत सहा सदस्य व्यक्ती असून त्यांच्या कुटुंबांच्या मालकीची आठ एकर कोरडवाहू जमीन आहे• या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न अंदाजे रु•2000/- ते रु•3000/- च्या दरम्यान आहे• या लाभार्थ्याला पन्नास टक्के अनुदानाअंतर्गत 1985-86 साली बैलजोडी व बैलगाडी मिळाली• बैलगाडी भाड्याने तसेच प्रसंगी शेतीच्या कामासाठी वापरण्यास देता येऊ लागली• त्यामुळे या लाभार्थ्यांचा वैयक्तिक फायदा तर झालाच पण कुटुंबांच्या वार्षिक उत्पन्नात अंदाजे दोन हजारांची भर पडली असल्याने लाभार्थी खुश होता•

3•16 अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यातील धुळघाट येथील एका कोरकू लाभार्थ्याचा अनुभव वरील अनुभवासारखा आढळला•

अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यातील विविध आदिवासी पाड्यात पशुसंवर्धन, दुग्धव्यवसायय या योजनेअंतर्गत काही लाभार्थ्यांना भाकड म्हशी देण्यात आल्या• पण या म्हशी तेथील वातावरणात कशा जगवायच्या, त्यांचे संगोपन कसे करावयाचे, याचे प्रशिक्षण न मिळाल्यामुळे बहुसंख्य म्हशी वर्षाच्या आतच दगावल्या• तसेच कुक्कुटपालन योजनेअंतर्गत या लाभार्थ्यांना कोंबडीच्या एक दिवसाच्या पिल्लांचे वाटप करण्यात आले• त्यांनाही कुक्कुटपालनाचे प्रशिक्षण मिळाले नसल्यामुळे बहुसंख्य लाभार्थ्यांकडील कोंबडीची पिल्ले पाच सहा महिन्यातच दगावली होती• तसेच या विभागातील काही लाभार्थ्यांना दोन तीन योजनांचा लाभ मिळाला असून कित्येक कुटुंबे एकाही योजनेचा लाभ न मिळाल्यामुळे उपेक्षित राहिलेली असल्याने परस्पर विरोधी चित्र पहावयास मिळाले• त्यामुळे येथे असे सुचवावेसे वाटते की, या योजनेखाली लाभार्थ्यांना पशुसंवर्धन, कुक्कुटपालन

यासारख्या बाबींचे प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे· तसेच संबंधित अधिका-यांनी केवळ योजना देऊन न थांबता त्याचा या लाभार्थ्यांना खरोखर काही लाभ होतो की नाही हे पाहण्यासाठी वेळोवेळी या योजना कितपत सफल झाल्या आहेत, याचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे· याशिवाय काही लाभार्थी कुटुंबांना दोन - तीन योजनांचा लाभ होतो तर काही आदिवासी कुटुंबे या योजनांपासून वंचित राहतात· हे चित्र बदलण्यासाठी ज्या कुटुंबाला एका योजनेचा लाभ देण्यात आला आहे, त्याची कागदोपत्री नोंद ठेवून त्याची दखल घेऊन दुसरी योजना त्याला न देता ज्या कुटुंबांना कोणत्याही योजनेचा लाभ अद्याप मिळालेला नाही, अशा कुटुंबांना देण्याची व्यवस्था करण्यात यावी·

····

## प्रकरण चौथे

### सर्व्हेक्षणात गोळा केलेल्या सांख्यिकी माहितीचे पृथःकरण

क्षेत्रीय पाहणीसाठी मिळालेल्या 77 लाभार्थीच्या माहितीचे पृथःकरण करण्यात आले. ही माहिती तक्ता क्र.4.1 पासून तक्ता क्र.4.7 पर्यंत दिलेली आहे.

**लाभार्थीचा मुख्य व्यवसाय :-**

4.1 सर्व्हेक्षणासाठी निवडलेल्या लाभार्थ्यांचा मुख्य व दुय्यम व्यवसाय यासंबंधी माहिती खालील तक्त्यात दर्शविली आहे.

तक्ता क्र.4.1

मुख्य व दुय्यम व्यवसायानुसार लाभार्थीचे तालुकानिहाय वर्गीकरण

| अ.क्र. | तालुका | एकूण लाभार्थी | मुख्य व्यवसाय | | दुय्यम व्यवसाय | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शेती | शेतमजूरी | शेतमजूरी | नोकरी | दुग्ध व्यवसाय |
| .1. | .2. | .3. | .4. | .5. | .6. | .7. | .8. |
| 1. | जुन्नर | 26 | 24 | 2 | -- | -- | 2 |
| 2. | आंबेगांव | 19 | 18 | 1 | 2 | 3 | 5 |
| 3. | खेड | 11 | 11 | -- | -- | 2 | 3 |
| 4. | धारणी | 21 | 17 | 4 | 1 | 1 | 8 |
| | एकूण | 77 | 70 | 7 | 3 | 6 | 18 |
| | टक्केवारी | 100 | 91 | 9 | 4 | 8 | 23 |

उपरोक्त तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, 91 टक्के लाभार्थी शेतीवर उपजिविका करतात. तर केवळ 9 टक्के लाभार्थी शेतमजूरी या मुख्य व्यवसायावर चरितार्थ चालवितात. तसेच 35 टक्के आदिवासी शेतीला पूरक व्यवसाय करतात, असे आढळले.

4.2 **दारिद्रय रेषेखालील लाभार्थी :-**

लाभार्थींना मिळणा-या वार्षिक उत्पन्नानुसार त्यांचे वर्गीकरण केले असता दारिद्रय रेषेखाली आढळणा-या लाभार्थ्यांचे तालुकानिहाय वर्गीकरण पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे.

तक्ता क्र.4.2

दारिद्रय रेषेखालील लाभार्थींचे तालुकानिहाय वर्गीकरण

| अ.क्र. | तालुका | एकूण लाभार्थी | दारिद्रय रेषेखालील लाभार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1. | .2. | .3. | .4. | .5. |
| 1. | जुन्नर | 26 | 17 | 65 टक्के |
| 2. | आंबेगांव | 19 | 18 | 95 टक्के |
| 3. | खेड | 11 | 9 | 82 टक्के |
| 4. | धारणी | 21 | 21 | 100टक्के |
| | एकूण | 77 | 65 | 84 टक्के |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, 84 टक्के आदिवासी हे दारिद्रय रेषेखालील आहेत. अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यामध्ये व पुणे जिल्हयातील आंबेगांव तालुक्यामध्ये दारिद्रय रेषेखाली असणा-या लाभार्थींचे प्रमाण सर्वाधिक (अनुक्रमे 100 टक्के व 95 टक्के) असल्याचे आढळून आले आहे. त्या खालोखाल खेड व जुन्नर येथील लाभार्थ्यांचा क्रमांक लागेल.

4.3 सर्व्हेक्षणामध्ये आदिवासींकडे असलेल्या जमीन धारणेचा विचार करता त्यांचे तालुकानिहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल.

तक्ता क्र.4.3

जमीन धारणेनुसार निवडलेल्या लाभार्थ्यांचे वर्गीकरण

| अ.क्र. | तालुका | एकूण लाभार्थी | जमीन धारणा (एकरमध्ये) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भूमीहिन | एक एकरपर्यंत | 1ते2 | 2ते4 | 4ते6 | 6ते10 | 10च्या पुढे |
| .1. | .2. | .3. | .4. | .5. | .6. | .7. | .8. | .9. | .10. |
| 1. | जुन्नर | 26 | -- | 2 | 2 | 11 | 4 | 7 | -- |
| 2. | आंबेगांव | 19 | 1 | 2 | 3 | 6 | 4 | 1 | 2 |
| 3. | खेड | 11 | -- | 1 | -- | 7 | 3 | -- | -- |
| 4. | धारणी | 21 | 2 | 1 | 3 | 4 | 5 | 5 | 1 |
| | एकूण | 77 | 3 | 6 | 8 | 28 | 16 | 13 | 3 |
| | टक्केवारी | 100 | 4 | 8 | 10 | 36 | 21 | 17 | 4 |

वरील तक्त्यावरुन माहितीचे पृथःकरण केले असता असे दिसते की, धारणी व आंबेगांव या तालुक्यामध्ये जवळ जवळ 4 टक्के भूमीहिन लाभार्थी आहेत. दोन ते चार एकर क्षेत्र असणा-यांचे प्रमाण चारही तालुक्यात सर्वाधिक एकूण 36 टक्के आहे. 21 टक्के लाभार्थ्यांची जमीन सहा एकरापेक्षा जास्त असून सहा एकरपर्यंत जमीन असलेले अल्पभूधारक हा निकष लावला तर 81 टक्के (आदिवासी) लाभार्थी हे अल्पभूधारक आहेत, असे म्हणता येईल.

वेगवेगळया योजनांचा फायदा घेणारे बहुसंख्य लाभार्थी हे अल्पभूधारक असल्याचे आढळून

आले.

## 4.4 लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न

आदिवासी लाभार्थ्यांसाठी असलेल्या निरनिराळया योजना व यातून आदिवासींच्या उत्पन्नात होणारी आर्थिक वाढ अभ्यासतांना मूळात त्यांच्या उत्पन्नाची पातळी अभ्यासणे आवश्यक ठरते. त्यादृष्टीने लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्नानुसार केलेले वर्गीकरण पुढील तक्ता क्र.4.4 मध्ये दिले आहे.

तक्ता क्र.4.4

लाभार्थ्यांचे तालुकानिहाय वार्षिक उत्पन्न

| अ.क्र. | तालुका | एकूण लाभार्थी | वार्षिक उत्पन्न (रुपयांत) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 0ते500 | 500ते 1000 | 1001ते 2000 | 2000ते 3600 | 3601ते 5000 | 5001च्या पुढे |
| .1. | .2. | .3. | .4. | .5. | .6. | .7. | .8. | .9. |
| 1. | जुन्नर | 26 | 1 | 12 | 10 | 2 | 1 | -- |
| 2. | आंबेगांव | 19 | 1 | 3 | 10 | 3 | 2 | -- |
| 3. | खेड | 11 | -- | 1 | 5 | 2 | 2 | 1 |
| 4. | धारणी | 21 | 1 | 1 | 5 | 8 | 2 | 4 |
| | एकूण | 77 | 3 | 17 | 30 | 15 | 7 | 5 |
| | टक्केवारी | 100 | 4 | 22 | 39 | 19 | 9 | 7 |

उपरोक्त तक्त्यातील माहितीवरुन असे आढळून येते की, सत्त्याहत्तर लाभार्थीपैकी पन्नास लाभार्थी म्हणजे 65 टक्के लाभार्थ्यांचे उत्पन्न अंदाजे जवळजवळ 2000 रुपयांपर्यंतच आहे. 1001 ते 2000 या उत्पन्नगटामध्ये सर्वाधिक म्हणजे 39 टक्के आदिवासी लाभार्थी आढळले. फक्त 16 टक्के लाभार्थी 3600 किंवा त्यापेक्षा जास्त उत्पन्न गटात असल्याचे आढळले. तर 19 टक्के लाभार्थी 2000 ते 3600 या उत्पन्न गटातील असल्याचे वरील तक्त्यावरुन निदर्शनास येते.

## 4.5 लाभार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा व स्थिती :-

आदिवासी लाभार्थींच्या शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांचे केलेले वर्गीकरण पुढील तक्त्यात दर्शविले आहे.

तक्ता क्र.4.5

लाभार्थ्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण

| अ.क्र. | तालुका | शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | निरक्षर | टक्केवारी | 1 ली ते 4 थी | 5 वी ते 7 वी | 7 वी ते 10 वी | एकूण लाभार्थी |
| .1. | .2. | .3. | .4. | .5. | .6. | .7. | .8. |
| 1. | जुन्नर | 9 | 34 | 8 | 5 | 4 | 26 |
| 2. | आंबेगांव | 5 | 26 | 4 | 5 | 5 | 19 |
| 3. | खेड | 4 | 36 | 1 | 3 | 3 | 11 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4. | धारणी | 19 | 90 | 2 | -- | -- | 21 |
| | एकूण | 37 | 48 | 15 | 13 | 12 | 77 |
| | टक्केवारी | 48 | 19 | 17 | 16 | 52 | 100 |

वरील तक्त्यावरून असे आढळून येते की, दोन्ही जिल्हयांमधून निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी 48 टक्के लाभार्थी निरक्षर आहेत. तर साक्षर लाभार्थ्यांची टक्केवारी 52 टक्के आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांची संख्या 42 टक्के आहे. अमरावती जिल्हयाअधील धारणी तालुक्यातील लाभार्थीमध्ये निरक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे आढळले तर पुणे जिल्हयातील खेड आंबेगांव, तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण त्यातल्या त्यात तुलना करता समाधानकारक आढळले.

## 4.6 योजनांमुळे उत्पन्नात वाढ झालेले लाभार्थी :-

लाभार्थींना विविध योजनापासून झालेल्या आर्थिकलाभामधील वाढ दर्शविणारा तक्ता पुढे दिला आहे.

तक्ता क्र.4.6

आर्थिक फायदा झालेले लाभार्थी

| अ. क्र. | तालुका | एकूण लाभार्थी | 1 ते 300 | 301 ते 500 | 501 ते 1000 | 1001 ते 2000 | 2001 ते च्या पुढे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | जुन्नर | 26 | 3 | 4 | -- | 1 | -- | 8 |
| 2. | आंबेगांव | 19 | 2 | - | 5 | 2 | -- | 9 |
| 3. | खेड | 11 | 2 | 2 | 2 | - | -- | 6 |
| 4. | धारणी | 21 | 1 | | -- | 3 | 7 | 11 |
| | एकूण | 77 | 8 | 6 | 7 | 6 | 7 | 34 |
| | टक्केवारी | | 10 | 8 | 9 | 8 | 9 | |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, 44 टक्के लाभार्थ्यांना या योजनांचा

प्रत्यक्ष लाभ झाला आहे· टक्केवारीप्रमाणे 1 ते 300 रुपयांपर्यंत आर्थिक फायदा झालेले लाभार्थी 10 टक्के आहेत· तर 501 ते 1000 पर्यंत 8 टक्के व 2001 च्या पुढे आर्थिक फायदा घेतलेले लाभार्थी 9 टक्के आहे· एकूण लाभार्थी संख्या व प्रत्यक्षात आर्थिक लाभ मिळालेले लाभार्थी यांच्या संख्येतील तफावत पहाता योजनांचे बाबतीत प्रशिक्षण न दिल्यामुळे तसेच संबंधित अधिका-यांनी योजनांचा फायदा होतो की नाही अंमलबजावणीबाबत पाठपुरावा न केल्यामुळे निम्म्यापेक्षा जास्त लाभार्थ्यांना योजना मिळूनही आर्थिक फायदा झाला नसल्याचे वरील तक्त्यावरुन निदर्शनास येते·

तक्ता क·4·7

तांत्रिक मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळालेले लाभार्थी

| अ·क्र· | तालुका | एकूण लाभार्थी | तांत्रिक मार्गदर्शन लाभलेले लाभार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ·1· | ·2· | ·3· | ·4· | ·5· |
| 1· | जुन्नर | 26 | 16 | 61 टक्के |
| 2· | आंबेगांव | 19 | 12 | 63 टक्के |
| 3· | खेड | 11 | 6 | 55 टक्के |
| 4· | धारणी | 21 | काही नाही | काही नाही |
| | एकूण संख्या | 77 | 34 | |
| | टक्केवारी | 100 | 44 टक्के | |

उपरोक्त तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, फक्त 44 टक्के लाभार्थ्यांना तांत्रिक मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळाले आहे· म्हणजे फक्त 44 टक्के लाभार्थीच या प्रशिक्षण व तांत्रिक मागदर्शनाच्या सहाय्याने स्वतःचा आर्थिक विकास साधू शकतो·

अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यात दुग्धव्यवसाय विकास, पशुसंवर्धन आणि संगोपन याबाबत लाभार्थ्यांना मार्गदर्शन न मिळाल्यामुळे बहुसंख्य लाभार्थी कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय या योजना मिळूनही त्याचा आर्थिक फायदा घेऊ शकले नाही· तसेच यापैकी कित्येक

लाभार्थ्यांच्या म्हशी, कोंबडीची पिल्ले पाच सहा महिन्याच्या कालावधीतच दगावले असल्याचे आढळले

पुणे जिल्हयातील आंबेगांव, खेड, जुन्नर या तालुक्यात दुग्धव्यवसाय विकास, फळबागांची लागवड करण्याविषयी मार्गदर्शन, बीजपंप, नांगरपेरणी, डस्टर इ.चा वापर व उपयोग इ.साठी 44 टक्के लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आल्याचे आढळले.

....

# प्रकरण 5 वे

## निरीक्षणात्मक बाबी

क्षेत्रीय पाहणीतील निवडलेल्या पुणे जिल्हयातील खेड, जुन्नर, आंबेगांव, या तीन तालुक्यातील तसेच अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यातील लाभार्थीसंबंधी गोळा केलेल्या माहितीच्या आधारे खालील बाबी निदर्शनास आल्या.

1. 77 लाभार्थ्यांपैकी 3 लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आलेला नव्हता व खेड तालुक्यातील दोन लाभार्थी प्रत्यक्षात अस्तित्वात नसल्याचे आढळून आले. लाभधारकांच्या यादीमध्ये मात्र त्यांचा समावेश करण्यात आला आहे.

2. शेतक-यांना स्वतःच्या शेतीपासून मिळणारे उत्पन्न अपुरे असल्यामुळे 35 टक्के लाभार्थी हे दुय्यम व्यवसायात गुंतलेले आहेत. दुय्यम व्यवसायातही प्रामुख्याने दुग्धव्यवसायाकडे जास्त ओढा असल्याचे (23 टक्के) दिसून आले. इतर व्यवसाय म्हणजे उदा.कुक्कुटपालन, भाजीपाला व्यवसाय, फलोत्पादन, मत्स्यव्यवसाय इ.व्यवसायांकडे आदिवासी शेतक-यांचा कल कमी प्रमाणात दिसून आला.

3. माहितीचे पृथःकरण केले असता 84 टक्के आदिवासी शेतकरी दारिद्र्यरेषे खालील असल्याचे आढळून आले. रु.5,000/- च्या पुढे वार्षिक उत्पन्न असणारे फक्त 6 टक्के आदिवासी लाभार्थी आढळले. धारणी तालुक्यात 100 टक्के आदिवासी लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील आहेत.

4. खेड, जुन्नर, आंबेगांव व धारणी या चार तालुक्यांमध्ये 4 एकरपर्यंत जमीन असणारे 58 टक्के आदिवासी शेतकरी आहेत. तर 10 एकरापेक्षा जास्त जमीन धारण करणारे शेतकरी 4 टक्के आहेत.

5. विविध योजनांचा फायदा घेणा-यामध्ये 45 अल्पभूधारक लाभार्थी आढळून आले. त्यांचे प्रमाण एकूण लाभधारकाच्या 58 टक्के आढळून आले.

6. या चार तालुक्यामध्ये 23 टक्के लाभार्थ्यांना दुग्धव्यवाय 13 टक्के लाभार्थ्यांना पीकसंवर्धन, 13 टक्के लाभार्थ्यांना फलोत्पादन, 10 टक्के लाभार्थ्यांना पशुसंवर्धन योजनांचा लाभ मिळाला. त्यातील 44 टक्के लाभार्थ्यांच्या उत्पन्नात 100 रुपयांपासून 2000 रुपयांपेक्षा जास्त वाढ झालेली दिसून आली. यातही दुग्धव्यवसाय विकासाला आदिवासी शेतक-यांनी चांगला प्रतिसाद दिल्याचे आढळून आले.

7. पाहणीमध्ये आंबा व काजू कलमे यापासून शेतक-यांना लाभ झाल्याचे आढळून आले नाही. त्याचे पीक 3 ते 4 वर्षांनी हाती येत असल्याने भविष्यात त्यापासून लाभ होईल, असे शेतक-यांना वाटत असल्यामुळे या योजनांना कमी प्रतिसाद दिसून येतो. योजना मिळाल्यापासून अल्पकालावधीत फायदा मिळावा अशी त्यांची धारणा आहे.

8. पाहणीमध्ये खेड व जुन्नर कार्यालयाच्या अभिलेखावरून संदर्भ काळातील वर्षी (1988-89 व 1989-90) पीकसंवर्धन योजनेखाली अनेकांना लाभ झाल्याचे दिसून येते. परंतू प्रत्यक्ष लाभार्थींच्या मुलाखती घेतल्या असता जुन्नर तालुक्यातील एका लाभार्थीस 1985 पासून कोणत्याही योजनेचा लाभ दिल्याचे दिसून आले नाही असे आढळून आले, तर खेड तालुक्यातील अभिलेखामधील दोन व्यक्ती प्रत्यक्षात त्या तालुक्यात आढळून आल्या नाहीत.

## दुग्धव्यवसाय :-

9. "दुग्धव्यवसाय" योजनेअंतर्गत एक वर्ष वयाची पारडी वाटप या योजनेमध्ये शेतक-यांनी दिलेल्या मुलाखतीत जनावंराना दिल्या जाणा-या खावटी वेळच्या वेळी व शासनाने ठरवून दिलेल्या प्रमाणात न मिळाल्यामुळे जुन्नर तालुक्यातील तीन पारडया दगावल्या गेल्याचे आढळून आले. तर धारणी तालुक्यात उपरोक्त योजनेत दिलेल्या म्हशीचे संगोपन कसे करावे, त्यांना आजार झाल्यास औषधोपचाराबाबत मार्गदर्शन न मिळाल्यामुळे चार म्हशी दगावल्या तर एक प्रत्यक्ष भेटीच्या वेळी आजारी दिसली.

10. "कुक्कुटपालन" योजनेअंतर्गत धारणी तालुक्यात कोंबडीच्या एक दिवसांच्या पिल्लाचे लाभधारकांना वाटप करण्यात आले. पण कुक्कुटपालनाबाबत लाभार्थ्यांना योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे जवळजवळ या योजनेअंतर्गत लाभ घेणा-या चारही लाभार्थ्यांच्या कोंबडया (पिल्ले) सहा महिन्यात रोग पडून दगावली असल्याचे निदर्शनास आले आहे.

11. आंबेगांव, खेड, जुन्नर येथे प्रत्यक्ष मुलाखत घेतल्यानंतर असे आढळून आले की, पीकसंवर्धन फलोत्पादन, नांगरपेरणी, डस्टर यासारख्या योजनांचे प्रशिक्षण, तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन लाभार्थ्यांना मिळालेले आहे. या भागातील एकूण 56 लाभार्थ्यांपैकी 34 लाभार्थींना याचा लाभ मिळाला आहे.

12. पीकसंवर्धन योजनेअंतर्गत पुणे जिल्हयातील एका लाभार्थ्यास मिळालेली बैलगाडी मोडली तर बैल रोगाने दगावले.

13. मूल्यमापन अभ्यासात पाहणी केलेल्या सर्व योजना आदिवासींच्या कल्याणार्थ असल्या तरी त्यातील काही योजनांचे स्वरूप पाहता उदा. भाकड, गाभण म्हैस वाटप, एक वर्ष वयाची पारडी वाटप, वीजपंप, बैलगाडी, बैलजोडी वाटप, जमीन सपाटीकरण, सते वाटप अशा

योजनांमुळे आदिवासींची आर्थिक उन्नती होऊ शकते. एकूण 77 लाभधारकांपैकी आर्थिक उन्नतीच्या योजनेचे लाभ झालेले एकूण 34 (44 टक्के) लाभार्थी आढळून आले. त्यांच्या उत्पन्नात भरीव वाढ झाल्याचे दिसून आले.

14. आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी शेतक-यांना 100 टक्के अनुदानावर विद्युतपंप बसवून दिले जातात व कृषी विभागामार्फत 50 टक्के कर्ज व 50 टक्के अनुदान या तत्वावर विद्युत पंप बसवून दिले जातात. एकच योजना दोन वेगवेगळ्या विभागामार्फत दोन वेगवेगळ्या पध्दतीने राबविण्यात येते. परिणामतः कृषी विभागामार्फत राबविण्यात येणा-या योजनेस कमी प्रतिसाद मिळाल्याचे आढळून आले. तर आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या योजनेस ही योजना 100 टक्के अनुदानावर असल्यामुळे त्यांना चांगला प्रतिसाद मिळाल्याचे आढळून आले.

15. आदिवासी विकास विभागामार्फत 1988-89 ला दिलेले विद्युत पंप अद्यापपर्यंत (जून, 1991) विद्युत पुरवठयाअभावी तसेच पडून होते. त्यामुळे योजनेअंतर्गत वस्तु मिळूनही लाभार्थीला प्रत्यक्ष काहीच फायदा घेता आला नाही व त्यामुळे त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाली नाही असे दिसून आले.

## सर्वसाधारण निरीक्षण

क्षेत्रीय पाहणीअंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्यांच्या मुलाखतीद्वारे व फलोत्पादन, पीकसंवर्धन, दुग्धव्यवसाय व पशुसंवर्धन योजना इ. योजना राबवित असणा-या अधिका-यांचे अभिप्राय विचारात घेता निरीक्षणातून जे मुद्दे उपस्थित झाले त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

### 1. साक्षरतेचा अभाव व दुष्परिणाम :-

निवडलेल्या लाभार्थींमध्ये 48 टक्के लाभार्थी निरक्षर असल्याने त्यांना योजनांची पूर्णपणे माहिती मिळाली नाही. परिणामतः योजनांचा संपूर्ण फायदा आदिवासींना घेता आला नाही. उदा. शेतक-यांना खते वाटल्याचे रेकॉर्डवर दर्शविले आहे. पण सर्वेक्षणाचे वेळी असे आढळून आले की, प्रत्यक्षात त्याला खते दिली गेली नाहीत. तसेच भाकड गाभण म्हशींना दिल्या जाणा-या खावटी काही भागात दिल्या नाहीत तर काही ठिकाणी एकदाच दिल्या गेल्या. नंतर दिल्या नाहीत. तसेच आंबा कलमे, खते इ. वस्तू प्रत्यक्षात शेतक-यांपर्यंत पोहोचल्याचे दिसून आले नाही.

### 2. शेतीसाठी पाण्याची समस्या :-

फलोत्पादन योजनांमध्ये शेतीसाठी तसेच पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या असल्यामुळे बहुतेक शेतक-यांना फलोत्पादन, पीक व पशुसंवर्धन सारख्या योजनांचा लाभ घेता येत नसल्याचे बहुसंख्य शेतक-यांनी सांगितले. पाणी व चा-याअभावी ब-याच शेतक-यांनी म्हैस घेण्यास नकार दिला.

3. फळझाडे किंवा कलमे पडीक जमीनीत लावण्याची योजना उपयुक्त असली तरी आदिवासी शेतकरी ती स्विकारण्यास तितकेसे उत्सुक नसतात. कारण फळझाडांची लागवड केल्यानंतर 3-4 वर्षांनी पीक हाती येते व आर्थिक उत्पन्न मिळण्यास सुरवात होते. आदिवासी शेतकरी इतका काळ थांबण्यास तयार होत नाही, याचे मुख्य कारण त्याची आर्थिक परिस्थिती.

4. **आदिवासींमध्ये संघटनेचा अभाव :-**

स्थानिक पातळीवर आदिवासींची एकजूट घडविणारी किंवा लोकांना एकत्र आणणारी संघटना/संस्था अस्तित्वात नाही. पर्यायाने शासकीय योजनासंबंधी लोकांच्यामध्ये जागृती नाही. त्यामुळे विविध योजनांची माहिती, आदिवासींना होत नाही.

5. **तांत्रिक मार्गदर्शनाचा अभाव :-**

योजना राबविणा-या अधिका-याने वस्तु स्वरुपात लाभ दिल्यानंतर तांत्रिक मार्गदर्शन केलेले आढळून येत नाही. उदा. जुन्नर तालुक्यात लाभार्थ्यास डस्टर मिळाले पण ते कसे वापरावे याबाबतची तांत्रिक माहिती त्यास दिली न गेल्याने त्या वस्तुचा अद्याप प्रत्यक्ष वापर झालेला नाही.

6. **झाडे जोपासणे संदर्भात मार्गदर्शनाचा अभाव :-**

फळबाग योजनेमध्ये दिली जाणारी आंबा कलमे, फळझाडे कलमे दिल्यानंतर ती कलमे कशी लावावीत याचे मार्गदर्शन केले गेले पण, आळी पडणे, रोग पडणे, झाडांचे कोंब सुकणे इ. पासून झाडांचा बचाव करण्यासाठी कोणती उपाययोजना केली पाहिजे याबाबत मार्गदर्शन/सल्ला त्यांना मिळाला नसल्याचे समजले.

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील बराचसा भाग डोंगराळ असल्याने जमीनीची धूप मोठया प्रमाणावर होते. त्यामुळे फळझाडांची लागवड करणे शेतकरी पसंत करीत नाहीत.

7. जमीन धारणा व उत्पन्न यांचे अन्योन्य संबंध :-

पाहणीमध्ये असे आढळून आले की ज्यांच्याजवळ 4 एकरपेक्षा कमी जमीन आहे, असे

56 टक्के शेतकरी अल्पभूधारक आहेत. डोंगराळ दुर्गम भागामुळे पाण्याची सोय नाही. फक्त ठराविक हंगामापुरतेच पाणी उपलब्ध होते.

जमीन हलकी, डोंगर उतारावरील आणि पडिक अशा स्वरुपाची असल्यामुळे प्रत्यक्षात लागवडीखालील क्षेत्र मर्यादित आहे.त्यामुळे उत्पादित होणारे धान्य वर्षभर पुरत नाही. अशा परिस्थितीत आदिवासी शेतक-यांना दुय्यम व्यवसाय करावा लागतो. परिणामतः तो नेहमी आर्थिक विवंचनेत असतो. नवीन योजना राबविण्यास तो सहसा पुढे येत नाही. कारण नवीन योजनेमुळे फायदा होईलच याची खात्री आदिवासी शेतक-यास नसते. त्यासाठी नवीन योजनेबाबत त्यास माहिती देऊन व प्रात्यक्षिके दाखवून त्यांच्या मनात त्याबद्दल विश्वास निर्माण केला पाहिजे.

8. ज्या 43 लाभधारकांना योजनेत लाभ मिळूनही त्यांच्या आर्थिक उत्पन्नात प्रत्यक्ष वाढ झाली नाही याबाबत त्यांच्याकडून मुख्य कारणे जाणून घेतली असता असे आढळून आले की, सात जणांच्या पारडया दगावल्या. चार जणांची कोंबडयांची पिल्ले दगावली. एका लाभधारकाची बैलजोडी रोगाने दगावली. एका लाभधारकाची बैलगाडी मोडली. एका लाभधारकाला डस्टरचा उपयोग कसा करावा याचे मार्गदर्शन मिळाले नाही. त्यामुळे ती वस्तु वापरता आली नाही. 4 लाभधारकांनी दुभत्या जनावरांचे दूध घरीच वापरले. एका लाभधारकाने बैलगाडीचा वापर स्वतःची शेती व मालवाहतूकीसाठी केला. 3 लाभधारकांना अद्याप एक वर्षे वयाची पारडी दिल्यानंतर लाभ झालेला नाही. घरकूल व भांडवली योजनेंतर्गत 17 लाभधारकांनी वृक्ष लागवड केली असून उत्पन्न मिळण्यास 3 ते 4 वर्षाचा कालावधी लागणार आहे. तर 5 लाभार्थींनी दोन दोन योजनांचा लाभ घेतला आहे. 4 लाभार्थ्यांना अद्याप विद्युतपंपाचे कनेक्शनजोडून मिळाले नाही.

9. लाभ धारकापैकी ज्यांना मिळालेल्या लाभामध्ये काही भाग कर्ज स्वरुपात मिळाला. अशा एकूण 43 लाभधारकांना मिळालेल्या लाभात कर्जाचा समावेश होता. कर्जाची रक्कम रु.500 पासून ते रु.4000/- पर्यंत होती. कर्ज ज्या कारणासाठी दिले त्यात पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, स्वयंरोजगार, जमीन सपाटीकरण इ.चा प्रामुख्याने समावेश होता. सर्व लाभधारकांनी कर्जाचा वापर त्याच हेतूसाठी केल्याचे आढळले. मात्र पाहणीचे दिवशी पाच लाभार्थींकडे बैलगाडी, बैलजोडी व एक वर्षे वयाची पारडी अस्तित्वात नसल्याचे आढळले.

10. एकंदरीत विचार करता बहुतांश लाभधारकांनी त्यांना मिळालेल्या लाभाचा चांगला उपयोग करुन घेतला. तथापि काहींच्याबाबत त्यांच्या आवाक्यात नसलेल्या कारणामुळे अपेक्षित लाभ होऊ शकत नाही, असे म्हणता येईल.

11. योजना राबविणा-या अधिका-यांचे अभिप्राय पाहता काहींनी अडचण सांगितली की "अनुदान व कर्ज" असणा-या योजनांना चांगला प्रतिसाद मिळत नाही. आदिवासी शेतकरी कर्ज काढून योजनेचा लाभ घेण्यास फारसे उत्सुक नसतात. त्यामुळे अशाप्रकारच्या योजनांना म्हणावा तितका प्रतिसाद मिळत नाही.

## प्रकरण 6 वे

## निष्कर्ष/सूचना तथा शिफारशी

### साक्षरतेचा प्रसार :-

1. आदिवासींमध्ये असलेले निरक्षरतेचे प्रमाण कमी करून साक्षरतेच्या प्रसारास शिक्षण विभागामार्फत उत्तेजन देण्यात यावे. त्यामुळे त्यांच्या फसवणूकीचे प्रमाण कमी होऊन आदिवासी शेतकरी आपल्या हक्कांच्या बाबतीत अधिक जागरूक होतील. साक्षरतेच्या प्रसारामुळे शासनाच्या विकास योजना कार्यक्रम समजण्यास व त्याचा लाभ घेण्यात उपयुक्त होतील.

### पाणी समस्या सोडवणूक :-

2. आदिवासींची गंभीर समस्या पिण्यासाठी व शेतीसाठी पाण्याचा तुटवडा ही आहे. यासाठी शासनाने कायमस्वरुपी पाण्याची सोय करावी. या संदर्भात खालीलप्रमाणे सूचना कराव्याशा वाटतात.

आंबेगांव तालुक्यातील "डिंभा" धरणाचे, जुन्नर तालुक्यातील " माणिकडोह" व "कुकडी" धरणाचे व खेड तालुक्यातील "चासकमान प्रकल्प" वरील तिन्ही धरणाचे पाणी त्या त्या तालुक्यात लिफट पध्दतीने डोंगरावर खेचून डोंगराळ भागातील शेतीसाठी व पिण्यासाठी पाणी पुरविण्याची योजना शासनाच्या खर्चातून आखण्यात यावी.

वरील धरणे आदिवासी भागात असूनही धरणाच्या पाण्याचा लाभ आदिवासी शेतक-यांना घेता येत नाही.

### विकास कार्यक्रम योजनांना प्रसिध्दी :-

3. विकास योजनांचा उद्देश आदिवासींना पटवून देण्याची गरज आहे. यासाठी रेडिओ, दूरदर्शन संच, यासारखी दृकश्राव्य प्रसार माध्यमे आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये शासनाने मोफत पुरवावीत या व्यतिरिक्त स्थानिक पातळीवर चावडीवर, बसस्थानकावर, बस गाडयांवर विविध योजनांची माहिती देणारी चित्रे व भित्तीपत्रके/ चित्रे लावण्यात यावीत.

दूरदर्शन व रेडिओच्या माध्यमातून पथनाट्ये, पोवाडे, लोकनाट्य अशा स्वरूपाच्या कार्यक्रमांद्वारे आदिवासी शेतक-यांना समजेल अशा सोप्या भाषेतून विविध योजनांची माहिती देणारे लघुपट व वृत्तचित्रे प्रसारीत करण्यात यावीत.

गांवातील सामाजिक आदिवासी कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देऊन या योजना खेडोपाडी पोहोचविण्याची व्यवस्था शासनामार्फत करण्यात यावी.

**प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे :-**

4. आदिवासी भागामध्ये काम करणा-या ग्रामसेवकांना व आदिवासी युवकांना "प्रशिक्षण" देण्यात यावे.

5. सध्या दुग्धोत्पादन विभागामार्फत प्रशिक्षण दिले जाते. तशाच प्रकारचे प्रशिक्षण फलोत्पादन व कृषी विभागामार्फत प्रशिक्षणार्थींना देण्यात यावे. यामध्ये अधिक उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक पध्दतीची शेती, तांत्रिक अवजारे, वापरण्याची पध्दती सुधारीत बियाणे, खते, किटकनाशके इ.चा योग्यपध्दतीने कसा वापर करावा या संदर्भातील प्रात्यक्षिके दाखविण्यात यावीत.

6. लाभार्थींना वस्तु स्वरुपात लाभ दिल्यानंतर (उदा.ट्रॅक्टर, नांगर, किणी, वीजपंप, बैलगाडी, बैलजोडी, खते इ.) वस्तू वापराविषयीचे तांत्रिक मार्गदर्शन संबंधित विभागातील योजना राबविणा-या अधिका-यांनी करावे, म्हणजे वस्तू वापरात येऊन उत्पादन वाढेल व वस्तू स्वरुपातील दिलेल्या लाभाचा दुरुपयोग होणार नाही.

**फलोत्पादन योजनांचे स्वरुपात बदल आवश्यक :-**

7. फलोत्पादन कार्यक्रमाखाली लावलेली झाडे/कलमे तोडल्याने किंवा जनावरांनी खाल्ल्याने नष्ट होतात. त्याकरिता या योजनेखालील लाभार्थींना लाभ देतांना फळझाडांना पाणी व कुंपण घालण्याच्या योजनेचाही यामध्ये समावेश करण्यात यावा. तसेच आंबा, बोर कलमांवर रोगांपासून बचाव करण्यासाठी फलोत्पादन खात्यामार्फत फिरती औषधे फवारणी पथके तयार करावीत.

8. शेतक-यांना पुरविण्यात येणा-या वस्तू निकृष्ट प्रतीच्या नाहीत ना ? याची खात्री योजना राबविणा-या अधिका-यांनी आदिवासी शेतक-यांना वस्तू देण्यापूर्वी करुन घ्यावी.

9. "दुग्ध विकास" विभागामार्फत पुरविल्या जाणा-या पारड्या व दुभती जनावरे यांना पुरेशी

जाणारी खावटी वेळच्या वेळी व शासनाने ठरवून दिलेल्या प्रमाणात पुरविण्याचे प्रयत्न संबंधित खात्यामार्फत व्हावेत, जेणेकरुन योजनेचा फायदा लाभार्थींना मिळेल.

10. आदिवासी लाभार्थ्यांची पाहणी केलीअसता असे आढळून आले की, दुभत्या जनावरांना दिली जाणारी खावटी शेतीसाठी खते इ. शेतक-यांपर्यंत पोहोचवण्यासाठी वाटप पध्दतीत सुधारणा होणे आवश्यक आहे. वस्तूंच्या किंवा साधनांची प्रत्यक्ष तपासणीद्वारे खात्री करुन घेणेबाबत दक्षतापथक कार्यान्वित करावे.

**पडीक जमीन सुधारणा व वाटप :-**

11. आदिवासी भागात पावसाचे प्रमाण जास्त असल्याने व जमीन डोंगराच्या उतारावर असल्याने जमिनीची सतत धूप होते. अशा पडीक जमिनीवर वृक्ष लागवड करण्यासाठी शासनाने 100 टक्के अनुदान देऊन शेतक-यांना प्रोत्साहित करावे. तसेच योजना राबवितांना भूमीहिन लोकांचा विचार करुन त्यांना शासकीय जमीन उपलब्ध करुन द्यावी व ही योजना राबविण्यास भूमीहिन लोकांचाही सहभाग मिळविण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**योजनांचे सुसूत्रीकरण :-**

12. "विद्युत पंप" ही एकच योजना आदिवासी विकास विभाग व कृषी विभागामार्फत वेगवेगळया पध्दतीने राबविली जाते. त्या बाबतीत असे सुचवावेसे वाटते की, दोन्ही विभागामार्फत ही योजना सारख्याच पध्दतीने म्हणजे 100 टक्के अनुदान तत्वावर राबविण्यात यावी. तसेच विद्युतपंपाचे कनेक्शन त्वरीत जोडून मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी एम.एस.ई.बी.च्या अधिका-यांशी संपर्क साधून त्वरीत कार्यवाही व्हावी. व एम.एस.ई.बी.ला आदिवासी भागात आदिवासींच्या विद्युतपंपांना प्राधान्याने कनेक्शन देण्याबाबत आदेश द्यावेत.

**सेवाभावी संस्थांचा सहभाग :**

13. आदिवासी विभागात स्वयंसेवी संस्था सध्या कार्यरत आहेत. त्यांचे सहाय्य योजना राबविण्यासाठी संबंधित अधिका-यांनी घेतलेले दिसत नाही. स्वयंसेवी संस्थेचा व आदिवासी लाभार्थ्यांचा संबंध जवळचा असल्याने त्यांचे सहाय्य घेतल्यास योजना चांगल्या रितीने राबविण्यास मदत होईल व याचा लाभ दुर्गम आदिवासी लाभार्थींनासुध्दा घेता येईल.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
आदिवासी उपयोजना क्षेत्रातील कृषी व संलग्न सेवा विभागाकडून
राबविल्या गेलेल्या योजनांचा मुल्यांकन पाहणी १९९१

. . .

## प्रपत्र क्रमांक १

लाभार्थीसाठी भरावयाचे पत्रक

चौक क्रमांक १ : प्रास्ताविक माहिती

१. योजनेचे नाव व क्रमांक :

२. योजना कार्यान्वित करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव/हुद्दा :

३. लाभार्थी निवड क्रमांक :

४. लाभार्थीचे नाव : गाव: तालुका:

५. लाभार्थी आदिवासी/बिगर आदिवासी :

६. आदिवासी असल्यास जमातीचे नाव :

७. लाभार्थीचा १] मुख्य व्यवसाय :

२] दुय्यम व्यवसाय :

८. लाभार्थी दुर्बल/दारिद्र्य रेषेखालील घटक आहेत का ? :

९. लाभार्थीची शैक्षणिक पात्रता :

१०. लाभार्थी जवळ असलेली जमिन – [क्षेत्र एकरात]

कोरड: बागायत: एकूण:

११. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न : [रुपयात]

चौक क्र.२ : मिळालेली मदत [कृषि क्षेत्रात फक्त]

१२. कृषि व संलग्न सेवा या क्षेत्रात मागील ३ वर्षात लाभार्थीस कोणकोणत्या मदत/सहाय्य मिळाले ? [मिळालेली मदत [रुपयात]

| अ.क्र. | योजनेचे नाव | वर्ष | कर्ज | अनुदान | एकूण | कोणत्या स्वरूपात रोख/वस्तू स्वरूपे |
|---|---|---|---|---|---|---|

१३. लाभार्थींस मिळालेल्या मदतीचे स्वरूप व वर्णन:

१४. ही मदत कोणामार्फत मिळाली ?

१५. या योजनेचा तुम्हाला कसा उपयोग झाला ?

१६. तुम्हाला मदत वस्तु स्वरूपात मिळाली असल्यास ती तुमच्याजवळ आहे का ? असल्यास त्याची स्थिती ? नसल्यास त्याची कारणे ?

१७. योजनेबाबत लाभार्थींना [१] तांत्रिक सल्ला/मार्गदर्शन मिळाले का ? होय/नाही

[२] सल्ला/मार्गदर्शन मिळाले असल्यास त्याचा उपयोग तुम्हाला झाला का ? झाला असल्यास कसा ?

१८. तुम्हाला योजनेचा लाभ परिपूर्णपणे मिळाला असे वाटते का ?
होय/नाही
संपूर्ण लाभ मिळाला नसल्यास त्याची कारणे –
१]
२]
३]

१९. या योजनेमुळे तुमच्या उत्पन्नात वार्षिक अतिरिक्त वाढ किती झाली/होईल असे तुम्हाला वाटते ?

२०. मदत मिळाल्यानंतर मार्गदर्शन/पाहणी/अधिकाऱ्यांकडून वारंवार कोणी केली का ? विशद करा –

२१. पाहणी अधिकाऱ्याचे पाहणीबाबत मत –

नाव :
सही :
दिनांक :

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील कृषी व सलग्न सेवा शिक्षणाखाली राबविल्या गेलेल्या योजनांची मुल्यांकन पहाणी १९९१

आदिवासींच्या विकासात्मक कार्यक्रमात सहभाग असलेल्या अधिकारी/कर्मचारी व सेवाभावी संस्थांसाठी प्रश्नावली [विचार धारा]

प्रपत्र क्र. २

चौक क्र. १: प्रास्ताविक

अधिकाऱ्याचे/कर्मचाऱ्याचे नांव :
हुद्दा/पद :
मुख्यालय :

चौक क्र. २

२. अधिकारी/कर्मचारी/संस्था सहभाग -

अ] किती वर्षापासून आपण आदिवासी/कृषि क्षेत्रात काम करीत आहांत ?

वर्षे

ब] कोणत्या पातळीवर: ग्राम/तालुका/जिल्हा/राज्य

क] कृषी व सलग्न सेवा यातील कोणत्या कार्यक्रमाशी/योजनेशी आपला सहभाग होता ?

३. तुम्ही आदिवासी उपयोजनेत ज्या योजना राबवित आहात त्याचा आदिवासींकडून/इतरांकडून प्रतिसाद कसा आहे :-

१] आदिवासींकडून चांगला/मध्यम/बिलकूल नाही

२] इतरांकडून चांगला/मध्यम/बिलकूल नाही

४. तुमच्या योजनांना चांगला प्रतिसाद आदिवासींकडून मिळत नसल्यास त्याची कारणे –

५. या योजना आदिवासींना अधिक उपयुक्त फलदायी होण्यासाठी योजनेत तुम्हाला काय बदल सुचवासा वाटतो ? नमुद करा –

६. ही योजना अधिक फलद्रूप होण्याच्या दृष्टीने आदिवासींचा सहभाग अधिक कसा घडवून आणता येईल ?

७. विशेष सूचना

अधिकारी-याचे/कर्मचा-याची
स्वाक्षरी/दिनांक